MGM UNIVERSITY
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR
Join a Holistic Education System
ADMISSIONS OPEN 2024-25
Apply Now
www.mgmu.ac.in 9067612000

सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, १५ सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १७४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अनेक दशकांपासून जम्मू-काश्मीरच्या बरबादीला तिन्ही कुटुंबे जबाबदार

### पंतप्रधान मोदींचा काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स, पीडीपीच्या घराणेशाहीवर आघात

डोडा : जम्मू-काश्मीरला काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपीच्या घराणेशाहीने उद्ध्वस्त केले आहे. या तिन्ही कुटुंबांनी मिळून तुमच्यावर जो अन्याय केला आहे, तो पापापेक्षा कमी नाही. अनेक दशकांपासून जम्मू-काश्मीरच्या बरबादीला तिन्ही कुटुंबे जबाबदार आहेत, असा घणाघाती हल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चढवला. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी मोदी यांची शनिवारी (दि. १४) डोडा येथे रॅली काढण्यात आली. त्यानंतर ते सभेत बोलत होते.

सभेला संबोधित करताना ते पुढे म्हणाले की, आम्ही आणि तुम्ही मिळून सुरक्षित काश्मीर बनवू, ही मोदींची हमी आहे. यावेळी जम्मू-काश्मीरच्या निवडणुका भविष्याचा फैसला करणार आहेत. जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणूक तीन कुटुंब आणि जम्मू-काश्मीरच्या तरुणांमध्ये आहे. एका बाजूला तीन कुटुंबे, तर दुसऱ्या बाजूला स्वप्ने घेऊन निघालेली तरुण मंडळी. या तीन कुटुंबांनी येथे भ्रष्टाचाराला खतपाणी घातले. जमीन हडप करणाऱ्या टोळ्यांना प्रोत्साहन दिले. तुम्हाला छोट्या सुविधांसाठी तळमळ करायला लावली होती. या तिन्ही कुटुंबातील लोकांनाच सरकारी नोकऱ्यांमध्ये भरती करण्यात आल्याचा आरोप मोदींनी यावेळी केला.

काश्मिरी पंडितांबद्दल बोलताना पंतप्रधान म्हणाले की, तीन दशकांहून अधिक काळ झाला, या दिवशी आमचे काश्मिरी पंडित टिकलाल टपलू यांना दहशतवाद्यांनी शहीद केले. त्यांच्या हत्येनंतर काश्मिरी पंडितांवर अत्याचाराची न संपणारी मालिका सुरू झाली आहे. भाजपने काश्मिरी पंडितांसाठी आवाज उठवला आणि त्यांना पाठिंबा दिला. काश्मिरी हिंदूंच्या वापसी आणि पुनर्वसनासाठी टपलू योजना बनवण्याचे काम करण्यात आले आहे.

दहशतवाद शेवटचा श्वास मोजतोय

पंतप्रधान पुढे म्हणाले की, जम्मू-काश्मीरमधील तीन कुटुंबांनी येथे फुटीरतावाद आणि दहशतवादासाठी मैदान तयार केले. याचा फायदा देशाच्या शत्रूंनी घेतला. त्यांचा कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय चालू राहावा यासाठी हे लोक दहशतवादाला खतपाणी घालत होते. त्यांच्या गुन्ह्यांमुळे आमच्या मुलांना जीव गमवावा लागला. ही चंद्रभागा दरी वर्षानुवर्षे चाललेल्या दहशतवादाच्या कालखंडाची साक्षीदार आहे. दिवस उजाडताच अघोषित कर्फ्यू लागू करण्यात आला होता तो काळ आठवा. सर्व दुकाने ठप्प झाली, सर्व कामे ठप्प झाली. तेव्हा केंद्र सरकारचे गृहमंत्रीही लाल चौकात जाण्यास घाबरत होते. येथे दहशतवाद आता शेवटचे श्वास मोजत आहे.

गेल्या १० वर्षात जम्मू-काश्मीरमध्ये जो बदल झाला आहे तो स्वप्नापेक्षा कमी नाही. पूर्वी पोलिस आणि सैन्यावर दगडफेक करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या दगडांनी नवीन जम्मू-काश्मीर तयार होत आहे. हे सर्व कोणी केले आहे? मोदींनी हे केले नाही, तुम्ही जम्मू-काश्मीरच्या लोकांनी हे केले आहे.

## जम्मू-काश्मीरच्या बारामुला येथे ३ दहशतवादी ठार!

श्रीनगर : जम्मू-काश्मीरच्या किश्तवाडमध्ये दहशतवाद्यांनी काल अचानक हल्ला केला होता. या हल्ल्यामध्ये भारतीय लष्कराचे दोन जवान शहीद झाले होते. या हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारतीय लष्कराने अवघ्या २४ तासांच्या आत बारामुल्ला येथे शोधमोहिम राबवून ३ दहशतवाद्यांचा खात्मा केला. तसेच अजूनही काही दहशतवादी लपून बसले असून त्यांचा शोध घेतला जात आहे.

या परिसरात दोन ते तीन दहशतवादी लपून बसले आहेत. मारले गेलेले दहशतवादी आणि त्यांच्या गटाची ओळख पटवली जात आहे. जम्मू-काश्मीरमधील तिसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात बारामुल्ला, कुपवाडा आणि बांदीपोरा जिल्ह्यात १ ऑक्टोबरला मतदान होणार आहे. दरम्यान, जम्मू विभागातील किश्तवाड जिल्ह्यातील चत्रू गावात अजूनही दहशतवादविरोधी कारवाई सुरू आहे, जिथे शुक्रवारी दहशतवाद्यांच्या एका गटाशी झालेल्या चकमकीत लष्कराचे २ जवान हुतात्मा झाले आणि २ जण जखमी झाले आहे.

जम्मू विभागातील पुंछ, राजौरी, डोडा, कठुआ, रियासी आणि उधमपूर या डोंगराळ जिल्ह्यांमध्ये २ महिन्यांहून अधिक काळ लष्कर, सुरक्षा दल आणि नागरिकांवर दहशतवादी हल्ले होत आहेत. दहशतवादी अचानक हल्ला करतात आणि नंतर डोंगराळ भागातील जंगलात गायब होतात या हल्ल्यांना परदेशी दहशतवाद्यांचा एक गट जबाबदार असल्याचे बोलले जात आहे. या दहशतवाद्यांची संख्या ४० ते ५० आहे. या अहवालानंतर, लष्कराने त्या जिल्ह्यांच्या घनदाट जंगलात ४ हजारांहून अधिक प्रशिक्षित सैनिक तैनात केले आहेत, ज्यात विशेष पॅरा कमांडो आणि पर्वतीय युद्धात प्रशिक्षित सैनिकांचा समावेश आहे.

राज्यात पहिल्या टप्प्यात १८ सप्टेंबर रोजी चिनाब खोऱ्यातील डोडा, किश्तवार आणि रामबन जिल्ह्यांतील आठ विधानसभा जागांसाठी तसेच दक्षिण काश्मीरमधील अनंतनाग, पुलवामा, शोपियान आणि कुलगाम जिल्ह्यांतील १६ जागांसाठी मतदान होणार आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यात जम्मू, कठुआ आणि सांबा जिल्ह्यात अनुक्रमे २५ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबरला मतदान होणार आहे.

## उपराष्ट्रपतींच्या हस्ते संविधान मंदिराचे आज उद्घाटन!

तभा वृत्तसेवा

कन्नड दि.१४ सप्टेंबर - राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते आभासी पद्धतीने संविधान मंदिराचे आज १५ सप्टेंबर रविवार रोजी उद्घाटन संपन्न होणार आहे



कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतुन राज्यातील प्रशिक्षण संस्थेत संविधान मंदिर बनवण्यात आले आहेत यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या देशाच्या संविधाना बाबत सखोल माहिती असावी त्याबद्दल जागरूक असावे हा हेतू या कार्यक्रमाचा आहे

शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे स्थानिक पातळीवर संस्था व्यवस्थापन अध्यक्ष हर्षवर्धन जैन,आमदार उदयसिंग राजपूत, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड,उपविभागीय पोलीस अधिकारी विजकुमार ठाकूरवाड,तहसीलदार विद्याचारण कडवकर गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकने,मुख्यधिकारी नंदकिशोर भोंबे,गटशिक्षणाधिकारी नीता श्रीमाळ, आगारप्रमुख बाळासाहेब राठोड पोलिस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांच्या प्रमुख उपस्थित पार पडणार आहे, या कार्यक्रमासाठी विद्यार्थी, पालकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्या तृप्ती भोपे यांनी केले

## सोयगाव तालुक्यात पिसाळलेल्या कुत्र्याचा हल्ला; आठ जखमी

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१४ सप्टेंबर

सोयगाव तालुक्यातील वरठाण व बनोटीतांडा येथे गावात पिसाळलेल्या कुत्र्याने मुक्त संचार करत आठ जणांना कडाडून चावा घेत जखमी केल्याची घटना शुक्रवार (दि. १३) सकाळी आठ वाजता घडली .....

वरठाण व बनोटीतांडा येथे सकाळीच पिसाळलेल्या कुत्र्यांनी दोन तास धुमाकूळ घालीत ह्या कुत्र्याने तय्यब कुरेशी (वय ४७),भास्कर संसारे (वय ५५),कौतिक संसारे (वय६५),आशाबाई सांडु संसारे (वय ३८),पमाबाई होना खैरनार (वय ४२),प्रियंका भुजंगराव फासे (वय २३),रा.सर्व वरठाण तसेच बनोटीतांडा येथील निलेश कीरण पवार (वय ०९),अनिता भदु जाधव (वय १८),असे आठ जणांचे हातापायाला बोटांना तोंडावर पोटाचे कडाडून चावा घेऊन जखमी केले आहे दरम्यान हा पिसाळलेल्या कुत्र्याच्या शोधासाठी वरठाण बनोटीतांडा तरुण काठ्या लाठ्या घेऊन पाठलाग करीत होते तीन तासानतंर बनोटी तांडा येथील धनराज राठोड,वैशाली कीरण पवार,तुकाराम राठोड,सुरेश जाधव,बद्रीनाथ राठोड यांनी त्या पिसाळलेल्या कुत्र्यास ठार केले.

आठही रुग्णांना बनोटी प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून वरठाण येथील सहा जणांना पुढील उपचारासाठी जळगाव येथील सामान्य रुग्णालयात दाखल तर बनोटीतांडा येथील दोन जणांना छत्रपती संभाजीनगर येथील घाटीत दाखल करण्यात आले आहे

मोकाट कुत्र्यांचा हैदोस


शेजारील तालुक्यातून एका गाडीत मोकाट कुत्रे आणुन ती कुत्रे रात्रीच्या वेळी वरठाण परीसरात सोडण्याचा प्रकार अनेकवेळा झालेला आहे आधी गावातील कुत्रे व सोडलेली कुत्रे यांचा अनेकवेळा मोठा संघर्ष होतो त्यातच काही कुत्रे जखमी देखील होतात मग कालांतराने ती कुत्रे पिसाळतात रात्रीच्या वेळी सोडलेली कुत्रे वरठाण बसस्थानक परीसरातच राहतात रात्रीच्या दहा अकरा वाजेनंतर ही कुत्रे दुचाकी धारकांच्या मागे लागतात घाबरलेल्या अवस्थेत काही दुचाकी धारक पडुन जखमी झाल्याची घटना देखील घडल्या आहेत

मार्निक वाक जाणे बंद

गेल्या सहा महिन्यांपासून बाहेरील आलेल्या कुत्र्यानी गावात दहशत निर्माण केल्याने गावातील लहान बालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे अनेक तरुण मंडळी सकाळी पाच वाजता मार्निक वाकसाठी जातात पण ही कुत्रे अंगावर धावुन येत असल्याने अनेकांनी मार्निक वाकला जाणे बंद केल्याचे दीसुन येत आहे तरी ह्या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.





एका गणपती ध्ययावेड्या तरुणांनी घरात असा गणपती बसवला असून त्याची गावात चर्चा होत आहे बाळू काटकर व संपत्नीक पूजा करताना.

## सिल्लोड तालुक्यातील रोहयोअंतर्गत २ कोटी ३ लाखांचा थकीत निधी शासनाकडून प्राप्त : अब्दुल सत्तार

सिल्लोड : तालुक्यातील रोजगार हमी योजनेअंतर्गत २ कोटी ३ लाख रुपयांचा थकीत निधी शासनाकडून प्राप्त झाला असल्याची माहिती पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी दिली.

रोजगार हमी अंतर्गत थकलेल्या कुशल निधी तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावा यासाठी पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी रोहयो मंत्री ना. दादाजी भुसे यांना पत्र लिहून याबाबत पाठपुरावा केला होता. त्याअनुषंगाने दि. ६ सप्टेंबर रोजी रोजगार हमी योजनेअंतर्गत ४ कोटी ३० लाख रुपयांचा थकीत निधी शासनाकडून प्राप्त झाला होता. त्यांनतर आज दि.१३ रोजी दुसऱ्या टप्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत २ कोटी ३ लाख रुपयांचा थकीत निधी शासनाकडून प्राप्त झाला आहे. त्यामध्ये वयक्तिक सिंचन विहीर १३३ कामे, गुरांचा गोठा शेड १८ कामे, शेळी शेड ०४ कामे, वृक्षलागवड १ कामे असे एकुण १५६ कामांसाठीचा एकूण कुशल निधी २ कोटी ३ लाख रु निधी प्राप्त झाला आहे. रोजगार हमी योजनेअंतर्गत शासनाकडे थकीत असलेला कुशल निधी उपलब्ध व्हावा यासाठी पाठपुरावा सुरू आहे. टप्याटप्याने कुशल निधी प्राप्त होत आहेत. टप्याटप्याने उर्वरित सर्व निधी देखील लवकरच प्राप्त होईल असे पालकमंत्री ना अब्दुल सत्तार म्हणाले.

## व्ही जॉन इंडियातर्फे पहिल्या ८ फुटी गणपतीचे अनावरण

छत्रपती संभाजीनगर : सर्जनशीलता, परंपरा आणि नावीन्याचा अनोखा मेळ घालत, व्ही जॉन इंडिया या पुरुषांसाठीच्या ग्रुमिंग क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने ८ फुटी गणपतीच्या आकर्षक मूर्तीचे अनावरण केले असून, ही मूर्ती पूर्णपणे शेविंग क्रीम आणि फोम वापरून बनविण्यात आली आहे. पुण्यातील ग्रँड स्ट्रीट मॉल येथे 'व्ही जॉन गणपती' नावाने ही मूर्ती बसविण्यात आली आहे. या मूर्तीला एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये शेविंग क्रीम आणि फोमपासून बनविलेल्या सर्वात मोठ्या गणपतीचे अधिकृत स्थान मिळाले आहे.दैनंदिन जीवनातील ग्रुमिंगचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या व्ही जॉन इंडियाच्या प्रयत्नांतून ही सर्जनशील मूर्ती साकारण्यात आली आहे. हुशारी, नवा आरंभ आणि यशाचे प्रतीक असलेल्या गणरायाची निवड करत व्ही जॉन ब्रँडने सेल्फ केयर व ग्रुमिंगचे महत्त्व कल्पकतेने इतरांपर्यंत पोहोचविले आहे.

## नवीनतम दुर्गा पूजा मोहिमेद्वारे उत्सव साजरा

मुंबई– सेन्को गोल्ड अँड डायमंड्स ही भारतभरातील १६७ शोरूम्स असलेले संपूर्ण भारतातील अग्रगण्य ज्वेलरी विक्रेते आहे, ८५ वर्षांचा वारसा असलेला ब्रँड अनेक शोरूम्स आहे. सेन्को गोल्ड आणि डायमंड्सला टीआरए द्वारे सलग चौथ्या वर्षी २रा सर्वात विश्वसनीय ज्वेलरी ब्रँड म्हणून सूचीबद्ध करण्यात आला आहे. सेन्को गोल्ड अँड डायमंड्सने गेल्या काही वर्षांमध्ये महिलांना केवळ सजवूनच नव्हे तर त्यांच्या अनेक सीएसआर उपक्रमांद्वारे साजरे केले आहे. या भावनेला अनुसरून, सेनको गोल्ड अँड डायमंड्सने अपरूपा नावाची नवीन दुर्गा पूजा मोहीम सुरू करण्याची घोषणा केली, जिथे स्त्रीचे आंतरिक सौंदर्य, तिची लवचिकता, तिची शक्ती साजरी केली जाते. दुर्गा पूजा ही 'माँ दुर्गा' चे स्वागत आहे आणि प्रत्येक बंगालीच्या जीवनातील एक विशेष घटना आहे, आनंद, आदर, सांस्कृतिक वारसा आणि अभिमानाचा काळ. वर्षाची हीच वेळ असते जेव्हा भारत आणि जगभरातील लोक, विशेषत: बंगाली, त्यांच्या प्रियजनांसोबत एकत्र राहण्यासाठी आणि वर्षातील सर्वात मोठा सण – दुर्गा पूजा साजरा करण्यासाठी त्यांच्या घरी परततात.

## टाटा डॉट ईव्हीं 'फेस्टिवल ऑफ कार्स'

मुंबई : टाटा डॉट ईव्ही या भारतातील इलेक्ट्रिक मोबिलिटी रिवॉल्यूशनच्या अग्रणी कंपनीने आपल्या 'फेस्टिवल ऑफ कार्स' सेलिब्रेशन्सचा भाग म्हणून टियागो डॉट ईव्ही, पंच डॉट ईव्ही आणि नेक्सॉन.ईव्ही या सर्वाधिक विक्री होणाऱ्या मॉडेल्सवर अभूतपूर्व किमतींची घोषणा केली आहे. ग्राहकांसाठी ईव्ही अधिक उपलब्ध होण्याजोगे करण्यावर लक्ष केंद्रित करत नेक्सॉन.ईव्ही साठी किंमत जवळपास ३ लाख रूपयांपर्यंत आणि पंच डॉट ईव्ही साठी किंमत जवळपास १.२० लाख रूपयांपर्यंत कमी करण्यात आली आहे.

## एसएमएफजी इंडिया क्रेडिटद्वारे 1000व्या शाखेचा आरंभ

धुळे : एसएमएफजी इंडिया क्रेडिट कं. लि., भारताची गैर-बँकींग वित्तीय कंपनी (एनबीएफसी) क्षेत्रातील एक प्रमुख कंपनी असून, त्यांनी वाशी, नवी मुंबई इथे आपल्या १०००व्या शाखेच्या आरंभाची घोषणा केली आहे. या लक्षणीय प्रसंगामुळे देशभरातील आपला विस्तार करण्यामागील आणि अद्याप शिरकाव न झालेल्या बाजारपेठांपर्यंत वित्तीय सेवा पोहोचवण्यातील कंपनीची अढळ निष्ठा दृग्गोचर झाली आहे. या लक्षणीय मैलाच्या टप्प्याच्या निमित्त, एसएमएफजी इंडिया क्रेडिटनं इंडिया पोस्टसोबत सहयोग करुन एक विशेष आवरण आणि माय स्टँप प्रकाशित केले.

## जिल्ह्यात दि.१६ ची सुटी कायम : जिल्हाधिकारी

छत्रपती संभाजीनगर – राज्यात सोमवार दि.१६ रोजी जाहीर केलेली सुटी कायम ठेवावी अथवा रद्द करावी व त्याबदल्यात दि.१८ रोजी सुटी जाहीर करावी किंवा कसे याबाबत स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी यांनी निर्णय घ्यावा अशी अधिसुचना शासनाने जारी केली आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज सकाळी पोलीस आयुक्त प्रविण पवार, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड तसेच सर्व उपविभागीय अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन जिल्ह्यात सोमवार दि.१६ रोजी असलेली सुटी कायम ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

## भागवती विद्यालय बिडकीन शाळेत हिंदी दिवस साजरा



बिडकीन दि १४ सप्टेंबर : पैठण तालुक्यातील भगवती विद्यालय बिडकीन व नेहरू युवा केंद्र छत्रपती संभाजीनगर यांच्यासयुक्त विद्यमाने दि १४ रोजी मोठया उत्साहात हिंदी दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिवसेवा बहुउद्देशीय संस्थेचे ( सचिव ) पंकज धुळे अध्यक्ष मुख्याध्यापक एकनाथ राशींनकर सर होते. प्रथम मान्यवरानीं महात्मा गांधी व विद्येची देवता सावित्रीबाई फुलेंच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरवात केली. प्रशालेच्या मुख्याध्यापकांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार शाल श्रीफळ देऊन केला. हिंदी दिवस निमित्ताने शाळेत वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये प्रथम क्र कु. नाजिया पठाण, द्वितीय क्र कु.राजकण्या मंडाळ, तृतीय क्र कु. प्रतीक्षा जाधव हिने पटकवला. मान्यवरांनी हिंदीचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले कार्यक्रमाची प्रस्तावना रामनाथ धनवे सरांनी केली तर आभार श्रीधर जऱ्हाड सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रायभान रकटे , सुनील पवार अप्पासाहेब किसवे, खुशाल चव्हाण,श्रीम.विश्रांती सलगरे सुभाष राठोड, अशोक दुबे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाची सांगता हिंदी गीताने करण्यात आली.

# दुभाजक ओलांडून स्कॉर्पिओ कारवर धडकली; माय-लेकीसह चिमुकला ठार

तभा. वृत्तसेवा

वाळूज महानगर : छत्रपती संभाजीनगरहून पुण्याकडे जात असलेल्या बेसरकर व गीते कुटुंबीयांच्या कारला विरुद्ध दिशेने जाणाऱ्या भरधाव स्कॉर्पिओने दुभाजक ओलांडून जोरदार धडक दिली. या विचित्र भीषण अपघातात अजय बेसरकर यांची पत्नी, सासू, सहा महिन्यांचा चिमुकला असे तीन जण ठार झाले. ही हृदयद्रावक घटना वाळूजपासून ४ किमी अंतरावर छत्रपती संभाजीनगर ते नगर महामार्गावरील लिंबेजळगाव टोलनाक्याजवळ जुन्या शिवराई फाट्यावर शुक्रवारी (दि. १३) दुपारी तीन वाजेच्या सुमारास घडली. या अपघातात अजय बेसरकर, त्यांची मेहुणी व मेहुणीची मुलगी जखमी झाले आहेत. या अपघात प्रकरणी वाळूज पोलिस ठाण्यात फरार चालकाविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.





याविषयी पोलीस निरीक्षक राजेंद्र सहाणे यांनी दिलेल्या माहितीनुसार अजय बेसरकर (मूळ रा. अमरावती, सध्या स्थायिक पुणे) हे आपली सासू आशालता पोपळघट (६५), पत्नी मृणालिनी (३८), सहा महिन्यांचे बाळ, मेहुणी शुभांगिनी सागर गीते (३५) आणि मेहुणीची मुलगी दुर्गा सागर गीते (७) यांच्यासह अमरावती येथून कारने (एमएच २७ वी झेड ००४५) छत्रपती संभाजीनगरमार्गे पुण्याकडे जात होते. त्यांची कार जात असताना एक स्कॉर्पिओ (एमएच १२ केजे.

४१३४) भरधाव वेगात वाळूजकडे येत होती. टोलनाक्यापासून काही अंतर पार करत नाही तोच स्कॉर्पिओचालकाचा वाहनावरील ताबा सुटला व ही भरधाव गाडी दुभाजक ओलांडून दुसऱ्या बाजूने येणाऱ्या कारवर जोरात आदळली. या भीषण अपघातात कारमधील अजय बेसरकर यांची पत्नी, सासू व मुलाचा मृत्यू झाला तर अन्य तीन जण गंभीर जखमी झाले.

फरार चालक ताब्यात

घटनेची माहिती मिळताच पो. निरीक्षक राजेंद्र सहाणे यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक अजय शितोळे, पोउपनि. रमेश राठोड, पोलीस उपनिरीक्षक संदीप वाघ, वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक शंकर शिरसाठ, पोलीस अंमलदार रंजक सोनवणे व अन्य पोलीस घटनास्थळी पोहोचले. अपघातग्रस्त वाहने बाजूला करत त्यांनी वाहतूक सुरळीत केली. दरम्यान, घटनेनंतर स्कॉर्पिओचालक उद्धव ऊर्फ विशाल चव्हाण (रा. बकवालनगर, वाळूज) हा घटनास्थळी न थांबता पसार झाला होता. त्याचा शोध घेऊन पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र सहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अजय शितोळे करीत आहेत.

## घाणेगाव ग्रामपंचायतीचा तिढा सुटला : सदस्यांचे राजीनामे मागे



वाळूज महानगर : घाणेगावमधील विकासकामे करताना सदस्यांना विश्वासात घेऊन कामे केली जात नसल्याने येथील ग्रामपंचायत सदस्यांनी राजीनामा अस्त्र वापरत ग्रामपंचायत अल्पमतात आणली होती. परंतु येथे आयोजित तातडीच्या विशेष सभेमध्ये यापुढे सदस्यांना विश्वासात घेऊन कामे केले जातील, असे आश्वासन सरपंच व उपसरपंच यांनी दिल्याने राजीनामा दिलेल्या नऊ सदस्यांनी 'तलवार म्यान' करीत आपले राजीनामे परत घेतले आहे.

या ग्रामपंचायतीचे सरपंच केशव गायके यांच्या मनमानी कारभाराला कंटाळून आठवडाभरापूर्वी या ग्रामपंचायतीच्या नऊ सदस्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिल्याने गावात एकच खळबळ उडाली होती. विशेष म्हणजे ग्रामपंचायतीचा कार्यकाल संपण्यास अवघ्या चार महिन्यांचा कालावधी शिल्लक असताना सदस्यांनी राजीनामे दिल्याने ही ग्रामपंचायत अल्पमतात आली होती. गत काही दिवसांपासून नाराज सदस्य व सरपंच यांच्यात विकासकामावरून दरी निर्माण झाली होती. गावातील नागरी समस्या, पाणीपुरवठा, नवीन विकासकामे आदी प्रश्नाकडे सरपंच गायके हे कानाडोळा करीत असल्याचा आरोप सदस्य ज्ञानेश्वर गायके, सागर सातपुते, वंदना फाळके, संजय गोंधळे, वंदना गायकवाड, सुरेश गायकवाड, दुर्गा दुबे, कौशल्या बनकर व अनिता गायके यांनी केले. यानंतर दि. ३ सप्टेंबरला सरपंच केशव गायके यांच्याकडे आपल्या पदाचे राजीनामेही दिले होते. परंतु सर्व कामे विश्वासात घेऊनच पार पाडली जातील अशा अश्वासनानंतर या राजीनामा नाट्यावर पडदा पडला. यावेळी ग्रामविकास अधिकारी गणेश बोळसेकर, माजी पंचायत समिती सदस्य संतोष गायकवाड आदीसह नाराज सदस्यांची उपस्थिती होती.

# रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर एमआयडीसीची वक्रदृष्टी अडथळा आणणाऱ्या फांद्याऐवजी मोठमोठी झाडे तोडली





वाळूज महानगर हा औद्योगिक परिसर असल्याने या परिसराला सह बाजूने कारखान्याच्या दूषित हवेने प्रदूषित केले आहे त्यातच काही सामाजिक संघटनानी ठिकठिकाणी वृक्ष लागवडीचा मोहीम हाती घेऊन परिसर हिरवागार केला आहे. त्यालाही निसर्ग साथ देत मुक्त हाताने उधळण करीत आहे. परंतु गणपती उत्सवाच्या मिरवणुकीसाठी अडथळा येऊ नये या कारणामुळे एमआयडीसीच्या वतीने फांदया छाटण्याचे काम सुरू आहे परंतु अधिकारी – कर्मचारी यांचे दुर्लक्ष असल्याने फांद्या न तोडता मोठ मोठी झाडे तोडून टाकली जात आहे. यामुळे वृक्ष प्रेमींमध्ये तीव्र स्वरूपात नाराजी व्यक्त होत आहे.

**मिरवणूक मार्गावरील फक्त झाडांच्या फांद्या तोडण्याचीच परवानगी दिली होती. मी स्वतः दुपारपर्यंत त्याठिकाणी हजर होतो. परंतु तसा काही प्रकार घडला नाही. असे काही घडले असेल तर मी संबंधित कर्मचाऱ्यांना काळजी घेण्याचे सांगितले आहे. तरीही मी माहिती घेतो. गणपती विसर्जन मिरवणूक ज्या – ज्या मार्गावरून जाईल त्या मार्गावरील टपऱ्या व इतर अतिक्रमणे आम्ही काढून घेणार आहोत.**

**गणेश मुळीकर, अभियंता**

गणपती विसर्जन १७ तारखेला होणार असून त्यासाठी पूर्वतयारी म्हणून मार्गावरील अडथळा करणाऱ्या झाडांच्या फांद्या छाटण्याचे काम एमआयडीसीच्या वतीने सुरू आहे . परंतु बऱ्याच ठिकाणी झाडांच्या फांद्या न छाटता मोठमोठ्या झाडांच्या मुख्य खोडालाच घाव घालून बोडखे करण्याचे काम सुरू आहे. यामध्ये लाकूड तोडणाऱ्या ठेकेदाराचा फायदा असून याकडे मात्र एमआयडीसीचे कर्मचारी दुर्लक्ष करत आहे. वृक्षतोडीमध्ये विशेष करून लिंब व चिंच या झाडांना लक्ष करून बोडके करणे सुरू आहे त्यामुळे परिसरातील वृक्ष प्रेमी स्वरूपात नाराजी व्यक्त केली असून एमआयडीसीच्या वक्रदृष्टीने हा हिरवागार परिसर उजाड होणाऱ्या मार्गावर आहेत.

## छत्रपती संभाजीनगर पैठण मार्गावर शिवाई ई बस सुरु



बिडकीन दि. १४ सप्टेंबर : राज्यात लालपरी म्हणून ओळखली जाणारी एसटी बस आता नव्या रुपात समोर येत आहे वातावरणातील प्रदुषण कमी करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात पर्यावरणपूरक इलेक्ट्रॉनिक बस दाखल झाली आहे पैठण बिडकीन छत्रपती संभाजीनगर अशी शिवाई ई बस आज दि. १४ सप्टेंबर शनिवार पासून सुरु करण्यात आली आहे ,आज बिडकीन बस आगारात सकाळी नऊ वाजता आल्यानंतर एसटी महामंडळाचे विभाग नियंत्रक सचिन क्षीरसागर,आगार प्रमुख सिडको छत्रपती संभाजीनगर संतोष खाने व वाहक-चालक यांचा सत्कार करण्यात आला यावेळी बिडकीन आगार प्रमुख माणिक आष्टीकर, व प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थिती होती,या बस मध्ये सदर बससेवे मध्ये ०५ ते १२ वर्षापर्यंतच्या मुलांना अर्धे तिकीटाची अनुज्ञेय राहील, तिकीट दर छत्रपती संभाजीनगर ते पैठण फुल ११५ रुपये व हाफ ६० रुपये असे आहे, सदर बस सेवेमध्ये महिला, अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक ,दिव्यांग व्यक्ती व त्यांचे साथीदार,अर्जून/ द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त पुरस्कारार्थी, विद्यमान तसेच माजी विधानसभा, विधानपरिषद सदस्य, अधिस्वीकृती धारक पत्रकार तसेच शहीद सन्मान योजनेअंतर्गत शहीद जवानांच्या वीर पत्नी यांना सवलतीच्या दराने प्रवास अनुज्ञेय करण्यात येत आहे,तरी सर्व प्रवाशांनी सदर लाभ घ्यावा असे राज परिवहन महामंडळाकडून आवाहन करण्यात आले आहे.

## एमजीएममध्ये हिंदी दिवस उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.१४ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या भारतीय तथा विदेशी भाषा संस्थेच्या वतीने विद्यापीठाच्या आईन्स्टाईन सभागृहात हिंदी दिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. 'हिंदी पारंपरिक ज्ञान और कृत्रिम बुद्धिमत्ता को जोडना' ही या थीम घेऊन हिंदी दिवस साजरा केला जात आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.प्रमोद पाटील तर अध्यक्षतस्थानी कुलगुरू डॉ. विलास सपकाळ हे उपस्थित होते. यावेळी मंचावर अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, संचालक डॉ. के. पी. सिंग व सर्व संबंधित उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा.डॉ.प्रमोद पाटील म्हणाले, हिंदी भाषेला राष्ट्रभाषा बनविण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. कोणत्याही देशाची भाषा ही त्या देशासाठी महत्त्वपूर्ण असते. देशाच्या कोणत्याही भागामध्ये आपल्याला व्यवसाय करायचा असेल तर त्या भागाची भाषा आपल्याला येणे गरजेचे असते. भाषा ही आपल्याला रोजगार देऊ शकते, हा विश्वास आपल्यात निर्माण झाला पाहिजे. समकालीन काळामध्ये भारतीय भाषेला तंत्रज्ञानाशी जोडले असता ती सहज होऊ शकेल. हिंदी भाषेतील साहित्य संपन्न असून आपल्या देशात मोठ्या संख्येने ती बोलली जाते. आर्टिफिशियल इंटेलिजियन्सचा उपयोग भाषेच्या वापरामध्ये होताना दिसत आहे. तंत्रज्ञानाच्या वापराने आपल्याला अधिकाधिक भाषा शिकणे आजच्या काळामध्ये शक्य होत आहे. हिंदी भाषा तर आपण शिकायला हवीच मात्र, त्याचप्रमाणे इतरही भाषांचे ज्ञान आपल्याला असायला हवे. अधिक भाषांच्या ज्ञानाने आपल्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होऊन आपण आपल्या क्षेत्रात अधिक यशस्वीपणे काम करू शकतो, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. विलास सपकाळ यांनी यावेळी बोलताना केले.

येत्या काळामध्ये हिंदी पत्रकारिता हा तीन महिन्यांचा पदविका अभ्यासक्रम संस्थेच्या वतीने सुरू करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. आजच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी आपल्या स्वयंरचित हिंदी कवितांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचालक डॉ. के. पी. सिंग यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सुरेखा काळे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. अस्वद गोहर यांनी मानले.

## सोयगाव तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा संत ज्ञानेश्वर महाविद्यालय येथे संपन्न



सोयगाव,दि.१४ सप्टेंबर : जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,छत्रपती संभाजीनगर आयोजित सोयगाव तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा या संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे घेण्यात आल्या.या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी महाविद्यालयाचे प्रो डॉ.दिलीप बिरुटे,डॉ.भास्कर टेकाळे,डॉ.धोती,शेळके, काकडे,डॉ.सैराज तडवी,आजज तडवी,डॉ.सुशील जावळे, प्रा.निलेश गावडे आणि क्रीडा विभाग प्रमुख निलेश गाडेकर यांची उपस्थित होते.

## जमाव बंदी व शस्त्र बंदी आदेश जारी

छत्रपती संभाजीनगर, दि.१४(जिमाका)- आगामी काळातील सण, उत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९७१ चे कलम ३७(१)(३) अन्वये जमाव बंदी व शस्त्र बंदीचे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी जारी केले आहेत. दि.१६ ते दि.३० या कालावधीत हे आदेश लागू असतील. या आदेशान्वये सार्वजनिक ठिकाणी शस्त्र वापरण्यास, दाहक स्फोटक पदार्थ बाळगण्यास, प्रक्स्होभक भाषणे, असभ्य वर्तन करण्यास, प्रतिमा, आकृत्या इ. चे प्रदर्शन करण्यास इ. कृत्य करण्यास तसेच पाच किंवा पाचापेक्षा अधिक व्यक्तिंना विनापरवानगी एकत्र येणास बंदी घालण्यात आली आहे. या आदेशातून कर्तव्यावर असलेले पोलीस अधिकारी व अन्य सक्षम अधिकारी यांना वगळण्यात आल्याचेही आदेशात नमूद आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# छावणी गणेश महासंघातर्फे भव्य आरोग्य शिबिर, कुस्ती स्पर्धा, बुद्धिबळ स्पर्धा संपन्न

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी – दि.१४ सप्टेंबर रोजी छावणी गणेश महासंघातर्फे सर्व रोग निदान आरोग्य शिबिर घेण्यात आले. या आरोग्य शिबिरामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील तज्ञ डॉक्टर या शिबिरासाठी आवर्जून उपस्थित होते. या शिबिरात दंत चिकित्सकांचाही समावेश करण्यात आलेला होता. यामुळे या शिबिराला एक चांगला उदंड प्रतिसाद मिळाला आजच्या या शिबिरामध्ये विशेष करून महिलांचा मोठा सहभाग पहावयास मिळाला. अनेक महिलांनी आपल्या दातांची तपासणी करून घेतली त्याचप्रमाणे नागरिकांनी



आरोग्य तपासणी करून तज्ञ डॉक्टरांकडून विशेष माहिती समजून घेतली. आजच्या या शिबिराला छावणी गणेश महासंघाचे अध्यक्ष पुरुषोत्तम ठाकूर, कार्याध्यक्ष रखमाजी जाधव, किशोर कछवा, करण सिंग काकस, अनिल जयस्वाल, संजय गारोल, दीपक क्षीरसागर, अॅडवोकेट सुरेश वर्मा, एम.ए.अझर, नितीन यादव, पवन तेंडले हे उपस्थित होते.

आजचे हे शिबिर छावणीतील जिल्हा परिषद प्राथमिक मुलींची शाळा येथे आयोजित केलेले होते त्यामुळे या शाळेतील सर्व शिक्षक वृंद हेही या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये सर्व तज्ञ डॉक्टरांचे व शिक्षकांचे गणेश महासंघाच्या पदाधिकार्यांच्या हस्ते येथे सत्कारही करण्यात आला.

या शिबिरामध्ये अंदाजे ३०० ते ३५० महिला, पुरुष, लहान मुले, मुली यांनी लाभ घेतला. आजच्या या शिबिराला डॉ.गौरव कुमार कोकाटे, डॉ.साक्षी मालवी, डॉ.कीर्ती कुलकर्णी, डॉ.माणिक गोण गोफले, डॉ.किशन दुळगंडे, डॉ.वैभवी साधववार यांनी आपले अमूल्य असे योगदान दिले. तसेच दि.१२ सप्टेंबर रोजी झालेल्या कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन आमदार संजय शिरसाट, माजी खासदार चंद्रकांत खैरे, माजी महापौर अशोक सायना यांच्या हस्ते झाला व या स्पर्धेमध्ये विजय शिंदे यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

तसेच दि.१३ सप्टेंबर रोजी झालेल्या बुद्धिबळ स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक सिद्धांत रविकिरण पाटील द्वितीय क्रमांक अंश महिंद्र गायकवाड तृतीय क्रमांक सम्यक निलेश गायकवाड यांनी पटकावला. या स्पर्धेमध्ये सुदाम झोटिंग सर चीफ आर्बेटरेटर यांच्या मार्गदर्शनामध्ये ही स्पर्धा पार पाडण्यात आली.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सोयाबीन पिकाला सात हजार रुपये हमीभाव देण्याची मागणी

**तेर, दि.१४ सप्टेंबर -**

सोयाबीन पिकाला सात हजार रुपये हमीभाव देण्याची मागणी भारतीय किसान मोर्चाचे धाराशिव तालुका उपाध्यक्ष हनुमंत कोळपे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सध्या जो सोयाबीन पिकाला हमीभाव देण्यात आलेला आहे तो शेतकऱ्यांना परवडणारा नाही. शेतकऱ्यांना नांगरणी, मोगडणी, पाळी, वेचणी, खत-बियाणे, पेरणी, आंतरमशागत, खुरपणी, फवारणी, काढणी, भरडणे यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. शिवाय अवेळी पडलेल्या अतिवृष्टीमुळे झालेले पिकाचे नुकसान या सर्व बाबींचा विचार करता सोयाबीन पिकाला प्रति क्विंटल सात हजार रुपये हमीभाव देण्यात यावा अशी मागणी भारतीय किसान मोर्चाचे धाराशिव तालुका उपाध्यक्ष हनुमंत कोळपे यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.



# बहिणींच्या डोळ्यातील आनंद सांगतो; मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना 'सुपरहिट' : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे







### मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाला जिल्हाभरातील लाडक्या बहिणींची लक्षणीय उपस्थिती...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१४ सप्टेंबर -**

मला मुख्यमंत्री पदापेक्षा भाऊ हा शब्द जिव्हाळ्याचा वाटतो. मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाच्या आजच्या कार्यक्रमात अतिशय उत्साहाने सहभागी झालेल्या लाडक्या बहिणींच्या डोळ्यातील आनंद पाहून मनाला अतिशय समाधान मिळत आहे.त्यांच्या डोळ्यातील हा आनंद म्हणजे या योजनेच्या यशस्वीतेची पावती आहे. ही योजना 'सुपरहिट' ठरल्याचे यातून स्पष्ट होत असल्याची भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. परंडा येथे आज महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती कार्यक्रमात ते बोलत होते.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजी सावंत, आमदार ज्ञानराज चौगुले, माजी आम दार सुजितसिंह ठाकूर, जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव, प्रा. शिवाजी सावंत, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत, अनिल सावंत, दत्ता साळुंखे, प्रा. गौतम लटके, आण्णासाहेब जाधव, राहुल डोके, जयदेव गोफणे, जाकीर सौदागर, सुभाषसिंह सद्दिवाल, रत्नकांत पापा शिंदे, संजय बनसोडे, वाजीद दखनी, गुलाब शिंदे, बालाजी नेटके, शशीकांत खुने यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केल्यानंतर अनेकांनी याविषयी शंका उपस्थित केल्याचे सांगून मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले, महिला सक्षम तर देश सक्षम हे ब्रीद लक्षात घेवून राज्य शासनाने ही योजना प्रभावीपणे राबविली. या योजनेतून लाडक्या बहिणींच्या खात्यावर रक्कम जमा झाली असून त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, त्यांच्याकडून मिळणारे प्रेम पाहिल्यानंतर मनाला समाधान मिळत आहे.

लाडक्या बहिणींच्या चेहऱ्यावरील आनंद असाच कायम ठेवण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह राज्य शासनाच्या इतरही योजना यापुढेही सुरु राहतील. लाडक्या बहिणींची साथ देणारा हा एकनाथ आहे असे सांगून या योजनांसाठी निधीची तरतूदही शासनाने केली असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. तसेच भविष्यात या योजनेचा लाभ टप्प्या-टप्प्याने वाढविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकरी कुटुंबातून आल्यामुळे मला गरिबीची जाणीव आहे. गरीब कुटुंबातील महिलांच्या दृष्टीने दीड हजार रुपयांचे मूल्य खूप मोठे आहे, हे अनेकांना माहित नाही.नुकतेच माझी भेट झाल्यानंतर प्रणाली बारड या बहिणीने मला सांगितले की, दीड हजार रुपयातून तिने घुंगरू कडीचा व्यवसाय सुरु केला. गौरी गणपतीच्या सणात तिला या व्यवसायातून दहा हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले. याच प्रकारे इतरही भगिनींनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतून मिळालेले पैसे आपापल्या परीने विविध व्यवसायात गुंतविले आहे. त्यातून त्यांच्या व्यवसायाला आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. महिलांसाठी एसटी प्रवासात ५० टक्के सवलत दिल्यानंतर तोट्यातील एसटी महामंडळ नफ्यात आले. त्याचप्रम ाणे आता मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळेही राज्य शासनाच्या अर्थव्यवस्थेला नुकसान न होता चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेतून म हिलांना एका वर्षात तीन घरगुती गॅस सिलेंडर मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासोबतच मुलींना मोफत उच्च शिक्षण देण्याचा निर्णय घेवून त्यांच्या शिक्षणाला पाठबळ दिले आहे.

मुलीच्या जन्मापासून ते १८ वर्षांपर्यंत तिच्या बँक खात्यात टप्प्या-टप्प्याने एक लाख रुपये जमा करण्यासाठी लेक लाडकी योजना सुरु केली आहे. लाडक्या बहिणींसोबत लाडक्या भावांसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु करून त्यांना प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे. या प्रशिक्षणार्थीना राज्य शासन दरमहा सहा ते दहा हजार रुपये विद्यावेतन देणार आहे, अशी योजना राबविणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

शेतकऱ्यांसाठीही राज्य शासनाने मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेतून साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपांना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या धर्तीवर नमो शेतकरी सन्मान योजना सुरु करून देशात पहिल्यांदाच राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यावर दरवर्षी सहा हजार रुपये जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. यासोबतच शेतकऱ्यांना केवळ एक रुपये विमा हप्ता भरून प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ दिला असून शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

तसेच केंद्र शासनाने कांद्यावरील किमान निर्यात शुल्क रद्द करण्याचा आणि खाद्यतेलावर आयात शुल्क वाढविण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या पिकांना चांगला दर मिळण्यास मदत होणार असल्याने मुख्यमंत्र्यांनी केंद्र शासनाचे आभार मानले.

उजनी धरणातून सीना-कोळेगाव प्रकल्पात पाणी आणण्याचे काम प्रगतीपथावर आहे. हे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी येत्या पंधरा दिवसात बैठक घेणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. पालकमंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांनी या प्रकल्पाचे ९८ टक्के काम पूर्ण झाले असून गेल्या तीस वर्षांपासून प्रतीक्षा असलेला हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी लक्ष घालण्याची विनंती मुख्यमंत्र्यांना केली होती.

परंडा येथे छत्रपती शिवाजी म हाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

प्रास्ताविकामध्ये पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत यांनी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत गेल्या दोन वर्षात नागरिकांना पुरविण्यात आलेल्या आरोग्य सुविधांचा लेखाजोखा मांडला. गतवर्षी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे वारकऱ्यांना पुरविलेल्या आरोग्य सुविधांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने नोंद घेतली आहे.

याशिवाय आरोग्य विभागाने राबविलेल्या माता सुरक्षित तर कुटुंब सुरक्षित आणि जागरूक पालक सुरक्षित बालक या अभियानांमुळे राज्यातील म ातामृत्यू व बालमृत्यू दर कमी करण्यात यश आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच राज्यातील १२ कोटी ६५ लाखापेक्षा अधिक नागरिकांना महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेतून ५ लाख रुपयांचे आरोग्य विमा कवच दिले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागातील भरती प्रक्रिया पारदर्शकपणे राबवून जवळपास साडेअकरा हजार युवक-युवतींना नोकरी दिली आहे. बदली प्रक्रिया पारदर्शक करण्यासाठी पहिल्यांदाच ऑनलाईन प्रणाली विकसित केली असून याद्वारे अधिकारी, कर्मचारी यांच्या बदल्यांची कार्यवाही केल्याचे डॉ. तानाजीराव सावंत म्हणाले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसह इतर योजनांच्या महिला लाभार्थ्यांना यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरुपात धनादेश आणि निवड पत्र प्रदान करण्यात आले. यावेळी पारंपारिक वेशभूषेत आलेल्या सिंधू पवार आणि पूजा पवार या बंजारा समाजातील भगिनींनी मुख्यमंत्र्यांना राखी बांधली.

प्रारंभी लाडक्या बहिणींचे स्वागत स्वीकारत मुख्यमंत्री शिंदे यांनी कार्यक्रमस्थळी प्रवेश केला. यावेळी अनेक बहिणींनी त्यांना राखी बांधली. तसेच काही महिलांनी त्यांच्यासोबत मोबाईलवर सेल्फी घेण्याचा आग्रह केला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी स्वतः महिलांच्या मोबाईलमध्ये सेल्फी काढून देत आपल्या लाडक्या बहिणींचा मान राखला.

मुख्यमंत्री शिंदे आणि पालकमंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांनी लाडक्या बहिणींवर पुष्पवृष्टी करून त्यांचे स्वागत केले. श्री तुळजाभवानी देवीची प्रतिमा आणि कवड्याची माळ, श्री विठ्ठल मूर्ती, वीणा व घोंगडी देवून यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांना मुख्यमंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन ऐश्वर्या हिबारे आणि निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांनी केले. आभार जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी मानले.

कार्यक्रमाला धाराशिव जिल्ह्यातून मोठ्या संख्येने महिला भगिनींची उपस्थिती होती.

### परंडा शहरात महापुरूषांचे पुतळे उभारणीसाठी निधी

परंडा शहरात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांचे पुतळे उभे करा त्यासाठी मी शासकीय निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिली.

### शासकीय कार्यक्रम खासगी व्यक्तींचा पक्षप्रवेश...

मुख्यमंत्री शिंदे व पालकमंत्री सावंत यांच्या उपस्थित महिला सशक्तिकरण अभियान हा शासनाचा कार्यक्रम पार पडला. परंतु यावेळी शासनाच्या कार्यक्रम ात इतर पक्षाच्या खाजगी व्यक्तींचे पक्ष प्रवेश कार्यक्रम घेण्यात आले हे योग्य आहे का? अशी चर्चा उपस्थित नागरिकात होत होती.

महिला सशक्तिकरण कार्यक्रमासाठी परंडा-भूम-वाशी मतदारसंघाचे एकमेव भाजप नेते तथा विधान परिषदेचे माजी आमदार सुजितसिंह ठाकूर हे आवर्जून उपस्थित होते. परंतु त्यांना कार्यक्रमात बोलण्याची संधी मिळायला पाहिजे होती. ती का मिळाली नाही याची सुद्धा चर्चा कार्यक्रम पार पडल्यानंतर नागरिकांमध्ये होत होती.

## जिल्ह्यातील दहा खो-खो खेळाडूंची शासन सेवेत थेट नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ सप्टेंबर -**

महाराष्ट्र सह देशाला विविध खेळातून सुवर्णपदक मिळवून देत राज्याची मान उंचावणाऱ्या खेळाडूंना ना कोणतीही परीक्षा, वा इंटरव्यू न देता राज्य शासनाने महाराष्ट्रातील विविध खेळाडूंना थेट नियुक्ती देत सरकारी नोकरी दिली आहे.



त्यामध्ये धाराशिव जिल्ह्याला खो खो ची पंढरी म्हणून ओळखले जाते. त्यातीलच एकूण दहा खो खो खेळाडूंची महाराष्ट्र शासनाने थेट नियुक्ती द्वारे सरकारी नोकर भरती केली आहे. त्यामध्ये धाराशिव जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय खो-खो खेळाडू निकिता पवार व गौरी शिंदे यांची राजपत्रित अधिकारी वर्ग दोन पदी थेट नियुक्ती झाली आहे.

तर राष्ट्रीय सुवर्णपदक विजेते ऋतुजा खरे, संपदा मोरे, मयुरी पवार, प्रीती काळे, जानव्ही पेठे, किरण शिंदे व निखिल मस्के यांचे वर्ग चार पदी थेट नियुक्ती झाली आहे.

या नियुक्ती बद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मनापासून आभार तसेच महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सचिव प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी घेतलेल्या विशेष परिश्रमामुळे अधिक अधिक खो-खो खेळाडूंना शासन सेवेत नोकरी लागण्यासाठी मदत झाली आहे.

## त्रिशक्ती गणेश मंडळाचा अनोखा उपक्रम; मयत सदस्याच्या मुलींच्या नावे एक लाखांची मुदतठेव

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१४ सप्टेंबर -**

येथील त्रिशक्ती तरूण मंडळातर्फे जेष्ठ सभासद कै. सुजित साळुंके यांच्या निधन पार्श्वभूमीवर मिरवणुकीचा अतिरिक्त खर्च टाळत परिवाराला एक आधार म्हणून त्यांच्या पाश्चात असलेल्या २ मुलींच्या नावे एक लाख अकरा हजार रुपये-इतकी रक्कम वर्गणी गोळा करुन मुदतठेव पावती माध्यमातून शनिवार दि.१४ रोजी महंत वाकोजीबाबा, महंत मावजीनाथ बाबा, महंत व्यंकट अरण्य बाबा, युवा नेते विनोद गंगणे, माजी नगराध्यक्ष सचिन रोचकरी, आनंद कंदले यांच्या हस्ते देण्यात आली.



यावेळी औदुंबर कदम, किशोर साठे, शिरीष कुलकर्णी, किशोर गंगणे, शिवाजी बोधले, अमर हंगरगेकर, शांताराम पेंदे, धैर्यशील दरेकर, गुरुनाथ बडुरे, सचिन ताकमोघे त्याचबरोबर त्रिशक्ती तरूण मंडळाचे आधारस्तंभ नरेश अमृतराव, संतोष छत्रे व मंडळाचे सभासद सूरज छत्रे, शितल अमृतराव, शिवाजी हाके, श्रीकांत छत्रे, पिंटू कामे, बालाजी वाघे, सोनू कोळगे, सौदागर पौळ, नाना अमृतराव, प्रेम पुजारी, महेश पुजारी, बालाजी बेरगळ, अमित छत्रे, आप्पा गायकवाड, शुभम छत्रे, सिद्धिराज कामे निलेश अमृतराव आदी उपस्थित होते.

## देव, धर्म, देश आणि अन्नाचा आदर करा : अश्विनी भोसले



**तभा वृत्तसेवा**
**कदेर, दि.१४ सप्टेंबर -**

श्री सिद्धेश्वर विद्यालय आणि स्वातंत्र्यसेनानी चंद्रशेखर बदोले उच्च म ाध्यमिक विद्यालय कसगी येथे सखी तक्रार निवारण मंच आणि इको फ्रेंडली क्लब उद्घाटनाप्रसंगी उमरगा पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक अश्विनी भोसले यांच्या हस्ते पार पाडले. विद्यार्थ्यांनी मन मनगट मेंदू सुदृढ करण्यासाठी व्यायाम योगासन प्राणायाम नित्य करावे असे आव्हान केले.

शरीराबरोबर स्वतःचा विकास घडवण्यासाठी शिक्षणाबरोबर संस्काराची जोड द्या, असेही आपल्या मनोगतात व्यक्त केले.

समाजात फिरताना मुली ताठ मानेने चाला तुमच्या जीवनामध्ये कोणत्याही अडचणी असतील तर पोलीस काका पोलीस सखी यांच्याकडे तुमच्या अडचणी नोंदवा, असेही यावेळी बोलताना म्हणाले. बदलापूर सारख्या घटना घडता कामा नये. त्यासाठी समाजाने जागृत राहावे.

वेळप्रसंगी कायद्याचा मदत घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा शिक्षणा संस्थेचे सचिव श्री विठ्ठलराव बदोले यांनी भोसले यांच्या कार्याचे कौतुक केले.

आमच्या विद्यालयात कार्यक्रमात आलेल्या प्रत्येक व्यक्तीचे प्रमोशन होते आपलेही लवकरच पोलीस अधीक्षकपदी प्रमोशन होईल ही सदिच्छा व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे अध्यक्ष प्राध्यापक विठ्ठलराव पटणे, उपाध्यक्ष विजयसिंह राजपूत, मुख्याध्यापक आर.एम. माशाळे, इको फ्रेंडली क्लबचे समन्वयक श्री गुरव मनोज हे उपस्थित होते

कार्यक्रमाच्या यशस्वीसाठी भाऊसाहेब पाटील, शिवपुत्र बळशेट्टी, प्राध्यापक म हकरकर, सखी मंचाच्या कायनात जमादार, इको फ्रेंडली क्लबचे योगेश काशिनाथ पाटील व मंडळाचे सर्व सदस्य विद्यार्थी यांनी मदत केले.

## उमरा गणेश मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परिक्षा



**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१४ सप्टेंबर -**

उमरा गावातील गणेश मंडळातर्फे अभिनव उपक्रम म्हणुन स्पर्धा स्पर्धेचे परीक्षेसंदर्भात विद्यार्थ्यांम ध्ये जागृती व्हावी, स्पर्धा परीक्षेची माहिती व्हावी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेसह विविध वयोगटानुसार वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या.

उमरा येथे सामान्यज्ञान परीक्षेत पाहिले ते दुसरी वयोगटात प्रथम दिव्यांका जाधव, द्वितीय विराज मोहिते, तृतीय शिवानी जाधव या विद्यार्थ्यांनी क्रमांक मिळवले. ३ ते ४ थी गटात प्रथम सिद्दी जाधव, द्वितीय हर्षद जाधव, तृतीय जाधव यांनी क्रमांक पटकावले. ५ ते ७ वी गटात प्रथम गौरी जाधव, द्वितीय प्रणिती विलास जाधव, तृतीय सिधी ना. जाधव यांनी क्रमांक पटकाविले. ८ ते १२ वी वयोगटात प्रथम सुगला प्रकाश शिंदे, द्वितीय यश शिंदे, तृतीय सार्थक जाधव यांनी बक्षीस पटकाविले.

या परीक्षेचे आयोजन हरी जाधव,महादेव जाधव, घातक ग्रुप, श्रीकांत जाधव, विशाल जाधव, मुकुंद जाधव, वैभव शिंदे, किरण जाधव, गणेश जाधव, रवि जाधव (कर निरीक्षक) यांनी पोलिस उपनिरीक्षक विलास जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केले.

## अग्रलेख...

# केवळ सशर्त जामीन, निर्दोष सुटका नव्हे!

उत्पादन शुल्क घोटाळ्यात गेल्या काही महिन्यांपासून तिहार तुरुंगात असलेले दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आपचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांना अखेर सर्वोच्च न्यायालयातून जामीन मिळाला आहे. यामुळे केजरीवाल यांना, त्यांच्या कुटुंबीयांना आणि आम आदमी पक्षाला आनंद होणे स्वाभाविक आहे. पण केजरीवाल यांची उत्पादन शुल्क घोटाळ्यात निर्दोष मुक्तता झाली नाही तर न्यायालयाने त्यांची सशर्त जामिनावर मुक्तता केली आहे, याचे भान त्यांनी स्वत: आणि त्यांच्या पक्षाच्या अतिउत्साही नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी ठेवण्याची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयाने केजरीवाल यांची १० लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर मुक्तता करण्याचे आदेश दिले आहेत, कोट्यवधी रुपयांच्या उत्पादन शुल्क घोटाळ्यात केजरीवाल यांच्यावर आरोप झाले, त्यामुळे १० लाख रुपयांची रक्कम ही केजरीवाल यांच्यासाठी अतिशय मामुली आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी सर्वोच्च न्यायालयाने याआधी मे महिन्यात केजरीवाल यांना सशर्त जामीन मंजूर केला होता. त्यावेळी तुरुंगातून बाहेर येताना जो माहोल आपच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी बनवला होता, ते पाहून केजरीवाल यांची जामिनावर सशर्त मुक्तता झाली नाही, तर ते एखादे युद्ध जिंकून आले की काय, असे वाटत होते. खलनायक असलेल्या केजरीवाल यांना नायक ठरवण्याचा प्रयत्न आपने जाणीवपूर्वक केला होता. आता जामिनावर बाहेर आल्यानंतरही केजरीवाल यांना मुख्यमंत्री कार्यालयात वा दिल्लीच्या सचिवालयात जाता येणार नाही, आणि त्याचबरोबर खूपच आवश्यक असल्याशिवाय कोणत्याही फाईलवर स्वाक्षरीही करता येणार नाही. याचाच अर्थ केजरीवाल यांना मुख्यमंत्री म्हणून आपले कोणतेही घटनात्मक अधिकार वापरता येणार नाहीत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने मुख्यमंत्री केजरीवाल यांची नाही तर आपचे राष्ट्रीय संयोजक असलेल्या केजरीवाल यांची जामिनावर मुक्तता केली, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. मुख्यमंत्री म्हणून केजरीवाल यांचे अधिकार जामीन मिळाल्यानंतरही न्यायालयाने गोठवल्यामुळे जामिनावर तुरुंगाच्या बाहेर येऊनही केजरीवाल यांना फारकाही करता येईल, असे वाटत नाही. फार फार केजरीवाल हरयाणा विधानसभा निवडणुकीत आपल्या पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार करू शकतील, त्यामुळे हरयाणातील आपच्या नेत्यांना आणि उमेदवारांना केजरीवाल यांची जामिनावर मुक्तता झाल्याचा आनंद सर्वात जास्त होऊ शकतो.

केजरीवाल यांना आधी अंमलबजावणी संचालनालयाच्या प्रकरणात जामीन मंजूर झाला होता. पण त्याचकाळात सीबीआयने अन्य एका प्रकरणात त्यांना अटक केल्यामुळे त्यांची जामिनावर मुक्तता होऊ शकली नव्हती. केजरीवाल यांना जामीन मंजूर करताना सर्वोच्च न्यायालयाने सीबीआयवर काही ताशेरेही ओढले आहेत. सीबीआयच्या तपासाच्या कार्यपद्धतीवर तसेच त्यांच्या हेतूवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. अंमलबजावणी संचालनालयाच्या कोठडीत असताना सीबीआयने केजरीवाल यांची आधी चौकशी केली आणि तुरुंगात असतानाच त्यांना अटक केली. त्यामुळे सीबीआयच्या अटकेच्या कारवाईला केजरीवाल यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. न्यायालयाने केजरीवाल यांना सीबीआयने केलेली अटकेची कारवाई वैध ठरवली आहे. त्यामुळे आपल्या राजकीय हेतूने सीबीआयने अटक केल्याच्या केजरीवाल यांच्या दाव्यातील हवा निघून गेली आहे. उत्पादन शुल्क घोटाळ्यात दिल्लीचे तत्कालिन आरोग्यमंत्री सत्येंद्र जैन, तत्कालिन उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया तसेच आपचे राज्यसभा सदस्य संजयसिंह यांना अटक झाली होती. या सर्वांची मागील काही महिन्यात जामिनावर मुक्तता झाली, त्यामुळे केजरीवाल यांचीही जामिनावर मुक्तता होईल, असे सर्वांनाच वाटत होते, तसेच झाले. त्यामुळे केजरीवाल यांची जामिनावर मुक्तता होणे हा अनपेक्षित नाही तर अपेक्षित असा निर्णय आहे. त्यातच गेल्या काही महिन्यातील सर्वोच्च न्यायालयाची जामिनाबाबतची भूमिका पाहत केजरीवाल यांची जामिनावर लवकरात लवकर मुक्तता होईलच, असे सर्वांना वाटतच होते. अटक हा अपवाद तर जामीन हा नियम अशी भूमिका वेगवेगळ्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने घेतलीच होती. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी सर्वोच्च न्यायालयाने केजरीवाल यांना तात्पुरता जामीन मंजूर केला होता. आता हरयाणा आणि जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठीही केजरीवाल यांना न्यायालयाने तात्पुरता नाही तर नियमित जामीन मंजूर केला, असे म्हणायला हरकत नाही. येत्या काही दिवसात महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभेच्याही निवडणुका घोषित होणार आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे फेब्रुवारी महिन्यात दिल्ली विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. म्हणजे मुख्यमंत्री म्हणून कोणतेही सरकारी कामकाज केजरीवाल करू शकणार नसले तरी आपचे राष्ट्रीय संयोजक म्हणून विधानसभा निवडणुकीत आपल्या पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार मात्र जोरात करू शकतात. आपमध्ये केजरीवाल हा भ्रष्ट असला तरी एकमेव चेहरा आहे, हे मान्य करावेच लागेल. केजरीवाल यांच्याशिवाय आपमध्ये डझनभर नेते असले तरी लोकमान्यता कोणालाच नाही. त्यामुळे आपच्या नेत्यांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये केजरीवाल यांना जामीन मिळाल्यामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण होणे स्वाभाविक आहे. केजरीवाल यांच्या दुहेरी अटकेमुळे नेतृत्वाचे जे संकट आम आदमी पक्षात निर्माण झाले होते, ते आता दूर झाले असे म्हणायला हरकत नाही. सिसोदिया आणि केजरीवाल यांच्या अनुपस्थितीत सुनीता केजरीवाल, आतिशी, सौरभ भारद्वाज आणि संदीप पाठक हे आपचे धोरणात्मक निर्णय घेत होते. काही दिवसांपूर्वी मनीष सिसोदिया यांना जामीन मिळाल्यामुळे त्यांनी नेतृत्वाची धुरा आपल्या हातात घेण्याचा प्रयत्न केला. केजरीवाल यांच्या अटकेमुळे १५ ऑगस्टला दिल्ली सरकारच्या झेंडावंदन कार्यक्रमात झेंडा कोण फडकवणार, असा प्रश्न निर्माण झाला होता. केजरीवाल यांनी आतिशी यांचे नाव तुरुंगातून पुढे केले होते. पण नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना यांनी केजरीवाल यांची सूचना अमान्य करत झेंडा फडकवण्याची जबाबदारी गृहमंत्री कैलास गहलोत यांच्याकडे सोपविली होती. उत्पादन शुल्क घोटाळ्यात अटक झाल्यानंतरही केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्यास नकार दिला होता. त्यामुळे देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच एका मुख्यमंत्र्यावर अटक होण्याची आणि तुरुंगात जाण्याची दुर्दैवी वेळ आली होती. आतापर्यंत देशाच्या इतिहासात पदावर असताना एकाही मुख्यमंत्र्याला अटक झाली नाही. अनेकांनी मुख्यमंत्रिपदाची गरिमा राखण्यासाठी अटक होण्यापूर्वी राजीनामा दिला होता. मात्र, केजरीवाल यांना आपली स्वत:ची तर सोडा पण सत्तेच्या अवाजवी मोहामुळे मुख्यमंत्रिपदाचीही प्रतिष्ठा राखता आली नाही. केजरीवाल जवळपास सहा महिन्यांपासून तुरुंगात असल्यामुळे दिल्ली सरकारचे कामकाज ठप्प झाले होते, कारण मुख्यमंत्री म्हणून केजरीवाल कोणत्याच फाईलवर स्वाक्षरी करू शकत नव्हते. सरकारी प्रक्रियेत फाईलवर स्वाक्षरी झाल्याशिवाय कोणताही निर्णय आणि त्याची अंमलबजावणी होत नाही. जामिनावर तुरुंगाच्या बाहेर आल्यानंतरही केजरीवाल यांना कोणताही निर्णय घेता येणार नाही, तसेच फाईलवर स्वाक्षरी करता येणार नसल्यामुळे दिल्लीच्या जनतेच्या दृष्टीने फारकाही फरक पडला, असे वाटत नाही. केजरीवाल तुरुंगात असताना जी स्थिती होती, तीच स्थिती ते जामिनावर बाहेर आल्यावरही कायम आहे. केजरीवाल यांची प्रतिमा आणि मानसिकता ही मुळत: अराजकतावादी अशी आहे. त्यामुळे जामिनावर तुरुंगाच्या बाहेर आल्यानंतरही ते सर्वोच्च न्यायालयाचे निर्बंधांचे पालन करतील, असे वाटत नाही. कोणताही नियम आणि कायदा धाब्यावर बसवण्यात केजरीवाल यांना भूषण आणि आनंद वाटत असतो. त्यामुळे न्यायालयाच्या बाहेर आल्यानंतरही ते आपल्या उन्मादी मानसिकतेचे प्रदर्शन केल्याशिवाय राहणार नाहीत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला त्यांच्या हालचालींवर बारकाईने नजर ठेवावी लागणार आहे. जामिनाच्या अटींचे केजरीवाल उल्लंघन करत असतील तर त्यांना पुन्हा तुरुंगात पाठवले पाहिजे. केजरीवाल स्वत:वर ही वेळ येऊ देणार नाही, याची अपेक्षा करायला हरकत नाही.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# भिऊ नका, मी तुमच्या पाठीशी आहे!

वाशीच्या विष्णुदास भावे नाट्यगृहात संभाजी ब्रिगेडचं अधिवेशन आयोजित केलं होतं. या अधिवेशनामधला ज्ञानेश महाराव यांचा एक व्हिडीओ व्हायरल होतोय्. सुमारे दीड मिनिटांचा हा व्हिडीओ आहे. या व्हिडीओमध्ये ज्ञानेश महाराव हे हिंदुस्थानचे प्राण, आराध्य दैवत प्रभू श्रीरामचंद्र आणि अनेक हिंदूंसाठी पूज्य असणारे अक्कलकोटचे स्वामी समर्थ महाराज यांच्यावर टीका करताना दिसत आहेत. विशेष म्हणजे या व्हिडीओत ज्ञानेश महाराव बोलत असताना मंचावर बारामती जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते शरद पवार बसलेले दिसत आहेत. मुळात महाराव यांनी केलेली टीका इतकी बालिश आहे की ज्यांनी कुणी त्यांचे नाव ज्ञानेश ठेवले, त्या नावाचाच त्यांनी नकळत अपमान केला आहे. श्रीरामांवर त्यांनी जे आरोप केले त्याचं खंडण अभ्यासकांनी याआधीच केलेलं आहे. त्यामुळे मी इथे त्यासाठी लेखणी खर्च करत नाही. कदाचित ते खंडण वाचण्याची, अभ्यासण्याची बुद्धी ज्ञानेश यांना झाली नसावी. मुळात ज्ञानेश महाराव यांना प्रभू श्रीराम किंवा स्वामी समर्थांवर आरोप किंवा टीका करायची नाही. तर त्यांना या दोन विभुतींची टिंगल करायची आहे. हे करत असताना त्यांनी ऊर्मिलेच्या चारित्र्यावर संशय घेतला, रामाचं खानदान काढलं, लायकी काढली. हद्द म्हणजे ते असंही म्हणाले की, माझ्या बहिणीला गरोदर असताना बाहेर काढलं तर मी तो कोण तिचा नवरा असेल त्याला शिल्लक ठेवीन काय? आपण त्याला देव मानतो, आपली आपल्याला लाज वाटली पाहिजे या वाक्याचा अर्थ काय होतो? स्वामी समर्थांवर टीका करताना त्यांच्या कपड्यांवरून त्यांची टिंगल उडवली आणि आपला नवरा, आपला मुलगा असा फिरला घरात तर चालेल काय संध्याकाळच्या वेळेला? बरं स्वामींची टिंगल उडवून या माणसाने शरद पवारांची स्तुती केली. '५० वर्षे शरद पवारांनी राजकारण केलंय काय ते असंच केलं? काय योजनाबिजना राबवल्या नाहीत, कर्जासाठी बँका नाही निर्माण केल्या.' इथपर्यंत ते थांबले नाहीत, तर ज्येष्ठ अभिनेत्री निवेदिता सराफ यांचासुद्धा महाराव यांनी अपमान केला. कोण टीव्हीवरनं सांगते कोण नटी आहे, अशोक सराफची बायको, की वरतून उडी टाकली तरी स्वामी वाचवतील, मग हिलाच ऑलिम्पिकमध्ये पाठवलं पाहिजे होतं न उड्या मारायला. शरद पवार यांना खुश करण्यासाठी, त्यांच्या मर्जीत राहण्यासाठी ज्ञानेश महाराव यांनी प्रचंड खालची पातळी गाठलेली आहे. भारताच्या बाहेर ज्या पंथाची स्थापना झाली आणि आज ज्या पंथाचे लोक भारतात राहतात, त्यांच्या देवांवर व पंथ-संस्थापकांवर टीका करण्याची हिंमत ज्ञानेश दाखवू शकतात का?

अध्यात्मातल्या अनेक गोष्टी खूप वैयक्तिक असतात, त्यात येणारा अनुभव अत्यंत वैयक्तिक असतो. असे अनुभव आपल्या संतांनादेखील आले आहेत. म्हणूनच विठ्ठल भक्तीची एक सुंदर परंपरा आपल्याकडे निर्माण झाली. ज्ञानेश्वर माउली ते संत तुकोबांपर्यंत या महान संतांनी येथे अध्यात्माची परंपरा रुजवली. आता हे डावे लोक तुकोबांनासुद्धा पुरोगामी करायला निघाले आहेत. तुकोबा सुधारणावादी अवश्य होते, पण ते विठ्ठलाचे निस्सीम भक्तही होते. अध्यात्म आणि सुधारणा या एकाच नाण्याच्या दोन बाजू असू शकतात, सुधारणा घडवून आणण्यासाठी धर्माचा त्याग करायची गरज नसते, हे संत तुकोबांनी आपल्याला शिकवलं. हीच परंपरा पुढे सावरकरांनी सुरू ठेवली. पण याची जाण ज्ञानेश महाराव यांना नाही. कारण हिंदू संस्कृती नष्ट करणाऱ्या गटाचे ते केवळ एक अतिसामान्य सदस्य आहेत. डावी विचारप्रणाली स्थापित करायची असेल तर हिंदू संस्कृती नष्ट करावी लागेल आणि त्यासाठी हिंदूंच्या श्रद्धास्थानांवर बोट ठेवावं लागेल. हे काम अनेक हिंदुद्वेष्टे करीत आहेत. ज्ञानेश महारावदेखील तीच री ओढत आहेत. मी जर एखाद्या देवाला/संताला मानत असेन, त्याची पूजा करत असेन व माझ्या श्रद्धेमुळे लोकांचे शून्य नुकसान होत असेल व मला आत्मशांती प्राप्त होत असेल, तर त्या देवाची/संताची पूजा करायची की नाही, हे सांगणारे ज्ञानेश महाराव कोण आहेत? संविधानाने मला माझ्या धर्माचं पालन करण्याचं, माझ्या आराध्य देवतेचं पूजन करण्याचं स्वातंत्र्य दिलं आहे. हे स्वातंत्र्य हिरावून घेणारे हे महाराव आहेत तरी कोण? महाराव ही एक अतिशय अतिसामान्य व्यक्ती असल्यामुळे या लेखात त्यांचा एवढा समाचार पुरे आहे.

मूळ मुद्दा असा आहे की लालबागच्या दर्शनाला येणारे आणि राज ठाकरे यांनी, नास्तिक आहेत, असं म्हटल्यावर त्यावर सारवासारव करून आपण आस्तिक आहोत, असं दाखवणारे ज्येष्ठ नेते शरद पवार हे देखील त्या मंचावर उपस्थित होते. हा सगळा गलिच्छ आणि दळभद्री प्रकार सुरू असताना शरद पवार यांनी ज्ञानेश महाराव यांना रोखलं नाही. त्यांना बोलू दिलं. राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक लोक श्रीरामांना मानत असतील, इतकंच काय तर स्वामी समर्थांची भक्तीही करत असतील. त्यांना असा प्रश्न पडत नाही का की, आपला सर्वोच्च नेता अशा मंचावर उपस्थित राहतो, जिथे आपल्या देवाची आणि संतांची टिंगल उडवली जाते. तर आपल्या नेत्याचं याबद्दल नेमकं काय मत आहे? त्यांनी एकदा हे स्पष्ट नको का करायला? अहो, स्वामी समर्थांची भक्ती करणारे भक्त अतिशय सज्जन आणि सामान्य कुटुंबातले आहेत. त्यांच्या भक्तीने कुणालाही इजा पोहोचत नाही. उलट भक्तांना आनंदच मिळतो. त्यांची उपासनादेखील सात्त्विक आहे. हा त्यांचा आनंद हिरावून घेण्याचा अधिकार कुणालाच नाही. अशा भक्तीला अंधश्रद्धा म्हणता येत नाही. उलट अंधश्रद्धा कशाला म्हणावं? तर माझाच देव खरा आहे, दुसऱ्यांचा देव खोटा आहे आणि माझ्या देवाला न मानणाऱ्या लोकांना जगण्याचा अधिकार नाही, त्यांना मारून किंवा मारता मारता मरून मला स्वर्गात गेल्यावर अनेक बायका उपभोगायला मिळतील. याला अंधश्रद्धा म्हणू नये का?

शरद पवार यांना लोकांनी जाणता राजा म्हटलेलं आवडतं. मग जाणत्या राजाची कर्तव्ये त्यांनी नको का पार पाडायला? शरद पवार ज्ञानेश महाराव यांना ज्येष्ठत्वाच्या अधिकाराने थांबवू शकत होते. मी आस्तिक आहे आणि राम हा माझा देव आहे, तू माझ्या देवावर गलिच्छ टीका करू शकत नाही. असं म्हणत वडिलकीच्या नात्याने त्यांचे कान धरू शकत होते. पण पवार गप्प राहिले. पवारांच्या मनात जे होतं, तेच महाराव म्हणाले का? हिंदू देवदेवतांची, संतांची टिंगल उडवली जात असताना त्यांना दिव्य आनंद प्राप्त होतो का? त्यांना हिंदू या शब्दाचा तिटकारा वाटतो का? अशी शंका आणि असे अनेक प्रश्न आपल्या मनात निर्माण होऊ शकतात. मला एक प्रश्न पडतो, शरद पवारांनी ५० वर्षे राजकारण केले. या ५० वर्षांत त्यांनी नेमकं काय मिळवलं? सुप्रिया सुळे आणि इतर राष्ट्रवादीचे नेते पवारांचा गौरव करतात त्यानुसार शरद पवार नावाचं इतकं दिग्गज नेतृत्व गेली ५० वर्षे महाराष्ट्रात राजकारण करत होतं, त्यातली अनेक वर्षे पवार सत्तेत सहभागी होते, मुख्यमंत्रिपदावर विराजमान होते, या ५० वर्षांत महाराष्ट्रात पवारांच्या नेतृत्वाखाली असा कोणता आमूलाग्र बदल घडला? पवारांनी जातीजातीतील भांडणं मिटवली का? मराठ्यांच्या व एकंदर महाराष्ट्राच्या हिताचे कोणते चांगले निर्णय त्यांनी घेतले? की त्यांनी ज्ञानेश महाराव यांच्यासारख्या द्वेष पसरवणाऱ्या लोकांना प्रोत्साहन देऊन मराठी माणसाच्या मनात गोंधळ निर्माण केला? ज्ञानेश महाराव यांनी स्वामी समर्थांवर टीका केली. तर स्वामींचं एक वाक्य भक्तांमध्ये प्रचलित आहे. भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे! शरद पवार देखील ज्ञानेश महाराव यांच्यासारख्या खलप्रवृत्तीच्या, द्वेष पसरवणाऱ्या लोकांना सांगत असतील का की, भिऊ नका, मी तुमच्या पाठीशी आहे! अशी शंका सर्वसामान्य हिंदूंच्या, मराठी माणसाच्या आणि श्रद्धाळूंच्या मनात निर्माण झालेली आहे आणि पवारांनीच पुढे येऊन या शंकांचे निराकरण करायचे आहे. तूर्तास, सर्वांना राम राम!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**नीलेश जोशी**

# गठ्ठा मतांसाठी थयथयाट

कल्याणकारी आणि कायद्याचे राज्य असावे, अशी सामान्य सज्जन नागरिकांची इच्छा असते. या निकषात काम करणारे राज्यकर्ते असले की, सामान्यजन आनंदी असतात. पण जे कायदा मानतच नाहीत, ज्यांची निष्ठा, श्रद्धा अन्यत्र असते, पण सोयीच्या वेळी जे प्रचलित कायद्याचा आधार घेतात आणि बहुतांश वेळा 'धर्मा'चा आधार घेत कायदा मोडतात, त्यांच्यामुळे अनेकदा समाजात अशांतता निर्माण करणाऱ्या घटना घडत असल्याचे दिसून येते. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या या गठ्ठा मतदारांसाठी स्वत:ला 'सेक्युलर' म्हणविणारे राजकारणी प्रसंगी आवाज मोठा करून आरडाओरडा करतात. ज्याने कायदा मोडला त्याची बाजू घेत मानवाधिकाराचे ठेवणीतील अस्त्र बाहेर काढतात. असे समर्थन करताना त्यांना कायद्याचे उल्लंघन झाल्याची चिंता किंवा मानवाधिकाराची काळजीही नसते. त्यांची अस्वस्थता असते केवळ आणि केवळ गठ्ठा मतांची. आपल्याला मिळणाऱ्या गठ्ठा मतदानासाठी त्यांचा थयथयाट असतो. हे सामान्यजनांचे, लोकशाही व्यवस्थेचे दुर्दैवच! शेती हा आपल्या उदरनिर्वाहाकरिता असलेल्या मुख्य स्रोतांपैकी एक. एवढेच नव्हे तर आपल्या देशाची अर्थव्यवस्था शेतीवर आधारित आहे. म्हणूनच शेती करणाऱ्या शेतकऱ्याला जगाचा पोशिंदा म्हटले जाते. शासन कुणाचेही असो शेतकरी जगावा, संपन्न व्हावा यासाठी उपाययोजना करण्यात येतात. आता तर केवळ शेतकरीच नव्हे तर त्याने उत्पादित केलेले अन्नधान्य सकस, आरोग्यदायी असावे म्हणून प्रयत्न केले जात आहेत. त्यात मुख्यत: आव्हान आहे ते रासायनिक शेतीमुळे जमिनीची पोत खालावल्याचे, रसायनयुक्त अन्नपदार्थ पोटात गेल्याने मानवाच्या आरोग्याचे. यावर उपाय म्हणून पारंपरिक सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्याची शासनाची भूमिका आहे. सेंद्रिय शेतीसाठी विविध महत्त्वपूर्ण पद्धतीमध्ये गोवंश आधारित शेती पद्धत आहे. ती टिकावी, जपावी म्हणून सर्वच समाजाने पुढाकार घेणे आवश्यक आहे. म्हणूनच शासनाने संपूर्ण गोवंश हत्या बंदी कायदा राज्यात लागू केला. पण कधी जिभेच्या चोचल्यासाठी तर कधी धर्मांध मानसिक वृत्तीतून गोवंशाची सर्रास कत्तल होते. कत्तल होण्यामागे धर्मांध वृत्ती अधिक कारणीभूत असल्याचे दिसून येते. बहुसंख्य हिंदूंची गायीला माता तर बैलाचे नंदी म्हणून पूजन करण्याची संस्कृती जपतात तर दुसरीकडे जिभेच्या चोचल्यासाठी म्हणा की धर्मांध विकृत मनोवृत्तीतून गोवंशाची सर्रास कत्तल केली जाते. एका अर्थाने हा संस्कृती अन् विकृतीतील संघर्ष आहे.



गत आठवड्यात चाळीसगाव येथून मुंबईला जाणाऱ्या रेल्वेत कथित 'मॉबलिंचिंग' झाल्याचे म्हटले जाते. पण ही घटना का घडली. संघर्षाचे कारण काय? तर, एक व्यक्ती मांस घेऊन रेल्वेने प्रवास करीत होता. त्याच्या बोगीत अन्य सहप्रवासीही होतेच. त्या विशिष्ट समाजाच्या व्यक्तीजवळ असलेले मांस गोवंशाचे असल्याचे सहप्रवाशांना कळले. पवित्र श्रावण महिन्यात ज्या नंदीचे पूजन केले जाते त्या नंदी अर्थात बैलाचे मांस हा व्यक्ती नेतो आहे म्हणजेच याने किंवा याच्या भावबंदाने गोवंशाची कत्तल केली असल्याचे लक्षात येताच बोगीतील अनेकांच्या भावनांचा उद्रेक झाला. त्याला मारहाण करण्यात आली. अर्थात कायदा हातात घेऊन कुठल्याही मारहाणीचे समर्थन होऊच शकत नाही. पण मुळात राज्यात गोवंश हत्या बंदी कायदा असताना विशिष्ट मोहल्ल्या-मोहल्ल्यात दररोज गोवंशाची होणारी कत्तल अन् त्यावर न होणारी कारवाई याच संतापाचा येथे स्फोट झाला असावा. मारहाण करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी म्हणून आमदार जितेंद्र आव्हाड संतप्त झाले. पण आव्हाड साहेब आपण जसे त्याला झालेल्या मारहाणीकरिता संतप्त होत रक्त आटविले तसे त्याने बंदी असलेले गोवंश मांस कुठून आणले, याच्या चौकशीच्या मागणीकरिता पुढे येणार का? आता असे म्हणू नका की, त्याच्याकडे म्हशीचे मांस होते. कारण, म्हशीचे मांस सांगत कुठल्या मांसाची विक्री होते याची तुमच्यासह राज्यातील सर्वांना चांगलीच माहिती आहे. दुर्दैवाने आव्हाड काय किंवा अन्य तथाकथित धर्मनिरपेक्ष म्हणविणारे पुढारी काय, सर्वांचाच थयथयाट असतो केवळ गठ्ठा मतांसाठी. त्यापुढे त्यांना काहीच सुचत नाही, हेच खरे! मात्र, नजिकच्या काळात या गठ्ठा मतांसाठी थयथयाट करणाऱ्यांना योग्य जागा दाखविण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

९४२२८६२४८४

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# हिट ॲण्ड रन नव्हे टॉक ॲण्ड रन!

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा संकेत याच्या कारने एका मध्यरात्री काही दुचाकी व चारचाकी वाहनांना धडक दिल्याची घटना घडली. आणि या घटनेवरून संकेत बावनकुळेच्या खांद्यावर बंदूक ठेवून ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा, बावकुळे यांच्यावर लक्ष्य करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. यावेळी, आपल्या वादात घरच्यांना ओढू नये... असे दाखले देणारे ठाकरे गटाचे नेते संकेतचे वडील नेते असल्याने, भाजपा प्रदेशाध्यक्षाच्या मुलाला जाणीवपूर्वक अडकविण्यासाठी जंगजंग पछाडत असल्याचे दिसत आहेत. त्यासाठी एका कपोलकल्पित बिलाची पटकथादेखील रचली गेली. या पटकथेचं शीर्षक 'बीफ कटलेट' ठेवण्यात आलं. आणि या कथेचा एकपात्री प्रयोग घरगडी राऊत माध्यमांसमोर येऊन करू लागल्याचे दिसले.

घरगड्याने रचलेल्या पटकथेतून, त्यांच्या कपोलकल्पित कथेतील बिलावर दारू, चिकन, मटणासह 'बीफ कटलेट'चाही समावेश असल्याचे सांगितले. हे सांगत त्यांनी हिंदुत्व शिकवणारे लोकं आता 'बीफ कटलेट' खाऊन, आम्हाला हिंदुत्व शिकवणार का? असा सवाल करत भाजपावर आसूड उगारण्याचा प्रयत्न केला. विषयाला भटकविण्याची, खोटं बोलण्याची, खोटी माहिती पसरविण्याची घरगड्याची तशी जुनीच खोड आहे. ते 'हिट ॲण्ड रन'चा मुद्दा चघळता चघळता कधी 'टॉक ॲण्ड रन' करतील याचा काही नेम नाही. घरगडी 'टॉक ॲण्ड रन'चे मास्टर आहेत. त्यांनी याविषयात डॉक्टरेट केली आहे. खोटं बोलणं आणि पळ काढणं हा त्यांचा एकप्रकारे धंदा झाला आहे. मी मजबूत पुराव्यांशिवाय बोलत नाही. म्हणून, मला जीवे मारण्याची धमकी मिळाल्याबाबतची घरगड्याने पोलिस आयुक्तांना लेखी तक्रार केली. त्यानंतर प्रसार माध्यमांसमोर येऊन कायदा व सुव्यवस्था बिघडल्याचा थयथयाट केला. जेव्हा पोलिसांनी राऊतांच्या पत्रावर चौकशी सुरू केली तेव्हा राऊतांनी त्यांच्या वृत्तपत्रात काम करत असलेल्या कनिष्ठ सहकाऱ्याचं नाव सांगितलं. पोलिसांनी त्याची चौकशी केली तेव्हा त्या सहकाऱ्याने आपण असे सांगितले नसल्याचे म्हटले होते. अर्थात हे प्रातिनिधिक स्वरूपातलं उदाहरण याठिकाणी देत आहोत. असे घुमजाव करत 'टॉक ॲण्ड रन' केल्याची राऊतांची भरमसाठ उदाहरणे आहेत. नावाने कार असणं आणि तो भाजपा प्रदेशाध्यक्षाचा मुलगा असणं एवढीच काय चुकी त्या संकेत बावनकुळे नावाच्या मुलाची. कार कोण चालवत होता, हे प्रत्यक्षदर्शींनी बघितलं. खरंतर आजच्या सोशल मीडियाच्या काळात आता घटना आणि सत्य, लपवणं आणि लपणं कठीण आहे. दिशा सालियनसारख्या प्रकरणांचा अपवाद वगळला तर. याठिकाणीचे सीसीटीव्ही फुटेज गायब करण्यात आले असल्याने, सत्य समोर आणण्यात थोडा वेळ लागत आहे. याचाच वचपा काढण्यासाठी आहे की काय माहिती नाही पण आमच्या मुलाला अडकवता काय? मग आम्ही तुमचा मुलगा अडकवू, ही भावना देखील आरोपकर्त्यांची असू शकते, बरं का...! या सूड भावनेतून बावनकुळेंचा मुलगा अपघात प्रकरणात अडकताना दिसत नाही तर, मग 'बीफ कटलेट' खाल्याच्या आरोपात अडकवा, म्हणजे केवळ बावनकुळेच नव्हे तर, भाजपा आणि जे कोणत्याही प्रकरणात सहज अडकत नाहीत त्या फडणवीसांनाही घेरता येईल. त्यासाठी मग 'बीफ कटलेट'सारखा धडधडीत खोटा आरोप केला. पोलिस तपास काय व्हायचा तो होऊ दे. मात्र, त्याआधीच आरोप खोटा असल्याचा छातीठोक दावा आहे. कारण, बाकी पहिल्या तीन वस्तूंविषयी वाद नाही. त्या सर्वत्र सहज उपलब्ध होऊ शकतात, हे आपण समजू शकतो. मात्र, 'बीफ कटलेट' याविषयी प्रश्नचिन्ह आहे. विषय संकेत बावनकुळेचा असो नाहीतर आदित्य ठाकरेंचा असो. महाराष्ट्रात एखादे रेस्टॉरंट, ज्याचा मालक हिंदू आहे. तो 'बीफ कटलेट' राजरोसपणे विक्री करणं, ही बाब शक्य नाही. त्याचं दुसरंही कारण महाराष्ट्रात गोहत्या बंदी लागू आहे. हे हॉटेल मालकाला निश्चित माहीत असणार. त्या व्यतिरिक्तदेखील एखाद्या हॉटेल व्यावसायिकाने चोरून लपून विकलं तर त्याचं उघडपणे बिल देईल इतका मूर्ख एखादा हॉटेल व्यावसायिक असेल, हे विश्वास बसण्यासारखे नाही. दारू विकणाऱ्या हॉटेल व्यावसायिकाकडे 'बीफ कटलेट'चे बिल न देण्याइतका किमान व्यावहारिक शहाणपणा तर असणारच. सगळेच संजय राऊत असतात अशातला भाग नाही.

त्या हॉटेलचा मालक संजय राऊत कॅटेगरीतला नाही. तो जीव तोडून सांगतोय, बीफ विकण्याची कल्पनादेखील मला सहन होत नाही. शिवाय त्याने संजय राऊतांवर मानहानीचा खटलादेखील दाखल केला. आता गाडीत बिल भेटलं त्यात 'बीफ कटलेट'चा उल्लेख आहे. या साऱ्या गोष्टी संजय राऊतला मुंबईत बसून कशा कळल्या असाव्यात? हा खरा प्रश्न आहे. मुळात मालकासारखं घरी बसून दरबारी राजकारण करण्याची सवय असलेल्यांना ऐकीव माहितीच्या आधारावर 'खोटं बोला पण रेटून बोला'ची सवय आहे. त्यामुळे तुक्का लागला तर लागला नाहीतर आता, हॉटेल मालकाकडून दाखल झालेल्या खटल्यातून पार्श्वभागाला पाय लावून 'टॉक ॲण्ड रन' राऊत करेल यात शंका नाही. संकेत बावनकुळेचे 'बीफ कटलेट' हे केवळ निमित्त मात्र आहे. यामागे दोन गोष्टी आहेत. यात पहिला उद्देश भाजपाविषयीचा द्वेष, असुया आणि अनामिक राग आहेच. शिवाय दुसरी बाब म्हणजे, राहुल गांधींनी केलेल्या आरक्षण हटविण्याच्या वक्तव्यावरून अनुसूचित जाती, जमातीच्या जनतेचं लक्ष भटकविण्याचा प्रयत्न यातून असला पाहिजे. कारण, विधानसभेची निवडणूक येऊ घातली असून, यात आरक्षण विरोधाचा फटका आपल्याला बसू नये हा हेतू असण्याची शक्यता आहे. तसे फार बुद्धिवादी विचारांची अपेक्षा बिनडोकांकडून करणे संयुक्तिक नाही. तरीदेखील काही गोष्टी नकळत कुणाच्या तरी सांगण्यावरून बिनडोक लोकंच करू शकतात, हे मात्र नक्की.

### शार्ट टर्म मेमरी लॉस

घरगड्याचे मालक उद्धव बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांना काही अज्ञात कारणासाठी भेटायला गेले होते. त्यांच्या भेटी मागचे रहस्य आजही गुलदस्त्यात आहे. ते अद्याप उघड झाले नाही. त्या भेटीमागचे कारण ना कधी मालकांनी सांगितले, नाही कधी घरगड्याने सांगितले. ना कधी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांनी सांगितले. या भेटीचा विसर पडलेल्या 'शार्ट टर्म मेमरी लॉस' घरगडी आणि लाचार सेना आता जाहीरपणे सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींकडे श्रीगणेशाच्या दर्शनासाठी गेलेल्या देशाच्या पंतप्रधानांच्या जाण्यावर अकांडतांडव करताना दिसत आहेत.

९२७०३३३८८६

## पितृपक्ष!



आपल्या हिंदू धर्मामध्ये आपल्या पूर्वजांचे आणि आपल्या संबंधात येऊन गेलेल्या प्रत्येक जीवाचे, त्यांनी केलेल्या कळत नकळत उपकाराचे स्मरणहेतू पितृपक्षाचे महत्त्व आपल्या शास्त्रात लिहून ठेवले आहे. आज देश-विदेशातील लोकांनाही याचे महत्त्व समजल्यामुळे ते आपल्या भारतात येऊन त्यांच्या पूर्वजांचे श्राद्धादिविधीकर्म करून पितृऋण फेडण्याचा प्रयत्न करतात. भाद्रपद कृष्ण प्रतिपदा ते भाद्रपद कृष्ण अमावस्या हा पितृपक्ष (महालयश्राद्ध) पंधरवडा म्हणून ओळखला जातो. या कालावधीत कुळातील सर्व पितर अन्न आणि उदक (पाणी) यांच्या अपेक्षेने आपल्या वंशजांजवळ येतात. पितृपक्षात पितृलोक पृथ्वीलोकाच्या सर्वाधिक जवळ येत असल्याने पितरांना दिलेले अन्न, उदक (पाणी) आणि पिंडदान त्यांच्यापर्यंत लवकर पोहोचते. त्यामुळे ते संतुष्ट होतात आणि कुटुंबाला आशीर्वाद देतात. श्राद्धविधी केल्याने पितृदोषामुळे व्यवहारात आणि साधनेत येणारे अडथळे दूर होऊन आपल्याला सहाय्य होते. 'सर्व पितर तृप्त व्हावेत आणि आपल्या व्यावहारिक त्याचप्रमाणे साधनेत प्रगती व्हावी यासाठी त्यांचे आशीर्वाद मिळावेत,' यासाठी पितृपक्षात आपल्या वडिलांच्या तिथीला श्राद्ध करावे. काही कारणास्तव पूर्ण श्राद्धविधी करणे अशक्य असल्यास संकल्पपूर्वक 'आमान्न श्राद्ध' करावे, म्हणजे आपल्या क्षमतेनुसार धान्य, तांदूळ, तेल, तूप, साखर, भाजी, नारळ, विडा, इ. शिधा साहित्य दक्षिणेसह एखाद्या पुरोहिताला द्यावे. पुरोहित उपलब्ध नसल्यास वेदपाठशाळा अथवा देवस्थान यांना दान/अर्पण करावे. तेही शक्य नसल्यास संकल्पपूर्वक 'हिरण्य श्राद्ध' करावे, म्हणजे आपल्या क्षमतेनुसार वरील ठिकाणांपैकी एका ठिकाणी धन अर्पण करावे. या वेळी 'माझे पितर या दानाने तृप्त होवोत, त्यांना पुढची गती प्राप्त होवो आणि आमच्या व्यावहारिक व अध्यात्मिक उन्नतीसाठी पितरांचे आशीर्वाद प्राप्त होवोत,' अशी प्रार्थना करावी. त्याचप्रमाणे सोबत आपल्या पितरांना सद्गती प्राप्त व्हावी या हेतूने 'श्रीगुरुदेव दत्त' हा जप रोज पूर्ण पंधरवाडाभर एक तास केल्यास उत्तमच. तसाही पितृदोष निवारणार्थ, कुटुंबातील सर्व सदस्यांनी, श्रीदत्ताचा जप रोज नियमितपणे एक तास करणे आवश्यकच आहे.

**श्रीकांत पाध्ये**/८२७५८६५२८५

## वाचक पत्रे

### लहान मुलांवरील वाढते अत्याचार चिंताजनक

अलीकडेच राज्यातील धुळे शहरातील मोगलाई परिसरात एका मुलावर अत्याचार झाल्याची घटना घडली. यातील सातपैकी तीन आरोपी अल्पवयीन आहेत. मागील आठ महिन्यांपासून हा प्रकार सुरू होता. हा प्रकार नक्कीच धक्कादायक असला तरी ते आठ महिन्यांपर्यंत पीडित अल्पवयीनाने जे सहन केले, त्या लहानग्याला हे सहन करायला लावणाऱ्या व्यवस्था किंवा समाज समुदायाने आपला परिसर व्यापलेला आहे, हे जास्त भयानक ठरते. आपल्यावर होणाऱ्या अत्याचारापेक्षा हा अत्याचार इतरांना समजल्यास त्याच्या होणाऱ्या परिणामांची भीती लहानग्यासाठी वेदनादायी होती, हे वास्तव यातून स्पष्ट होते. या मुलाला या गोष्टीची वाच्यता कुठे केल्यास मारण्याची धमकी देण्यात आली होती. या धमकीमागील भीती कुटुंब, जिव्हाळा, नातेसंबंधातील या लहानग्याच्या भोवताली असलेल्या लोकांच्या संबंधापेक्षा मोठी ठरली आहे. या मुलाच्या शारीरिक, मानसिक त्रासाविषयी कुटुंब किंवा । जवळपासच्या नातेवाईकांना थोडासाही सुगावा लागू नये, हे आपल्या कुटुंबव्यवस्थेचे अपयशच आहे. आणि हा त्रास असह्य झाल्यावर या मुलाने आपल्या पालकांना ही गोष्ट सांगितली. जर त्याची सहनशीलता आणखी असती तर कदाचित ही बाब खूप उशिराने त्याच्या पालकांच्या लक्षात आली असती, जे दुर्दैवी किंवा आणखी वाईट ठरले असते. या दुर्दैवी कुटुंबाने हा प्रकार समजल्यावर थेट पोलिस ठाणे गाठून तक्रार केली. पालकांनी लोकलाजेच्या भीतीने ही गोष्ट दाबून टाकली नाही, हे योग्यच झाले. अनेक प्रकरणात हेच होते. तर दुसरीकडे आळंदी येथील अनाथ मुलांच्या संस्थेतही अशीच घटना घडली. संस्थेत देखरेख करणाऱ्या कर्मचाऱ्यानेच एका अल्पवयीन मुलावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. अंबरनाथमध्ये अकरा वर्षाच्या मुलीवर सामूहिक अत्याचार झाल्याच्या घटनेनंतर सहा आरोपींना अटक केली. तर याच परिसरात एका अल्पवयीनावर दोघांनी अत्याचार केल्याची तक्रार दाखल झाली. या प्रकरणात पोलिसांनी सहाजणांना ताब्यात घेतले होते. आरोपींमध्ये एक अल्पवयीन मुलगी असल्याचेही स्पष्ट झाले. बदलापूर येथील नामवंत शाळेतील सफाई कर्मचाऱ्यांनी चार ते सहा वयोगटातील अल्पवयीन मुलींवर लैंगिक शोषण केले. लहानग्यांच्या लैंगिक छळाबाबत सजगतेमध्ये अनेक मुद्द्यांचा अंतर्भाव होणे गरजेचे आहे. आपल्या देशाची संस्कृती, संस्कार आदींच्या बळावर आपल्या समाज समुदायात अशा लहान मुलांवर होणारे अत्याचार पाप मानले गेल्याने अशा घटना घडणारच नाहीत. आपण त्याची चिंता आणि आवश्यक ती काळजी घेण्याची गरज नाही, या भ्रमातून पालकांनी बाहेर पडण्याची गरज आहे.

**मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### श्रीगणेश विसर्जन मार्गाची आयुक्त जाधव यांनी केली पाहणी

**परभणी,/प्रतिनिधी:** महानगर पालिकेचे आयुक्त धैर्यशील जाधव यांनी शुक्रवारी (दि.१३) शहरातील श्रीगणेश विसर्जनाच्या पूर्वतयारीची पाहणी केली. शहरातील सुभाष रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, गुजरी बाजार, गांधी पार्क, स्टेशन रोड, नारायण चाळ आदी भागांची पाहणी करून आढावा घेतला. यावेळी त्यांच्यासमवेत तीनही प्रभागांचे सहाय्यक आयुक्त प्रज्ञावंत कांबळे, सोमनाथ बनसोडे, प्रिया गोरखे, शहर अभियंता वासिम पठाण, पवन देशमुख, सोहेल सिद्दिकी, शेख अत्तर, राजकुमार जाधव, रामेश्वर कुलकर्णी, दिपक कानोडे आदी उपस्थित होते.अधिकाऱ्यांनी दिलेले काम अचूकपणाने पार पाडावे, कुठल्याही प्रकारे कामामध्ये हलगर्जीपणा करू नका असे सांगत ज्या मार्गाने नागरिकांसह वाहने जाणार आहेत त्याा मार्गावरील स्वच्छता करण्याचे आदेश त्यांनी दिले. काही व्यापाऱ्यांनी आपले साहित्या रोडवर ठेवले आहे त्याांना ते साहित्या काढून घेण्याच्या सूचना करा असे ते म्हणाले.

### दोन बालकांच्या पालकांचा शोध

**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्ह्यातील काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या शासकीय मुलांचे बालगृह या संस्थेत साई संदीप इंगोले (वय १० वर्षे) हा १७ जून २०१९ रोजी प्रवेशित झाला. या संस्थेत दाखल केल्यापासून त्याांचे आई-वडील अथवा नातेवाईक भेटायला आले नाहीत. साई अंगाने सडपातळ, चेहरा लंबगोलाकार असून, बालकाच्या पालकांनी ३० दिवसांच्या आत जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्रीमती आम्रपाली पाचपुंजे ९६९७९७०३५८ आणि अधीक्षक गोविंद अंधारे ९९२२६२५७३३ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच कृष्णा विद्याचल दुबे (वय १४ वर्षे) हा १४ जुलै २०१६ रोजी सामाजिक व आर्थिक विकास संस्था स्वप्नभूती केरवाडी येथे प्रवेशित झाला. तो रंगाने गोरा, सडपातळ आणि चेहरा लंबगोलाकार असून, त्याच्या मानेवर तीळ आहे. कृष्णा दुबे या बालकावर हक्क सांगणारे माता-पिता अथवा नातेवाईक असल्यास त्यांनी ३० दिवसांच्या आत जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्रीमती आम्रपाली पाचपुंजे ९६९७९७०३५८ आणि अधीक्षक श्री. लटपटे ९९२२९१४१०१ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### जनशताब्दी एक्सप्रेसला थांबा द्या

**परभणी,/प्रतिनिधी:** नांदेड विभागातील काही रेल्वे स्थानकांवर काही गाड्यांना प्रायोगिक तत्वावर थांबा देण्यात आला आहे. याला सहा महिन्यांकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे. शनिवारी (दि.१४) जनशताब्दी एक्स्प्रेसला सेलू, परतूर स्थानकांवर थांबा मिळणार आहे. प्रायोगिक तत्वावर थांबा देण्यात आलेल्या स्थानकांमध्ये नांदेड विभागातील सेलू, परतूर, मेहबूबाबाद, करीमनगर या चार स्थानकांचा समावेश आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई - हिंगोली जन शताब्दी, हिंगोली - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई जनशताब्दी या गाड्यांना सेलू, परतूर स्थानकांवर शनिवारी थांबा देण्यात येणार आहे.

### आयटीआयमध्ये आज संविधान मंदिराचे उदघाटन- विविध कार्यक्रमांचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी:** येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत रविवारी (दि.१५) उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते संविधान मंदिराचे उद्घाटन आभासी पद्धतीने होणार आहे. या अनुषंगाने येथे १२ ते १४ सप्टेंबर दरम्यान विविध कार्यक्रम व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक न्यायाची खरी शिकवण ही भारताच्या संविधानातून प्राप्त होत असल्यामुळे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांसाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून ४३४ शासकीय प्रशिक्षण संस्थेमध्ये संविधान मंदिराची स्थापना करण्यात आली आहे. नागरिकांमध्ये विशेषत उपेक्षित समुदायांमध्ये घटनात्मक अधिकार आणि कर्तव्याबदल जागृती वाढवणे, घटनात्मक समस्या दुरुस्त्याा समकालीन समाजातील घटनेची भूमिका यासारख्या विषयातील जागरुकता, विद्यार्थ्यांना त्यांचे घटनात्मक अधिकार समजून घेण्यास किंवा त्याचा वापर करण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना कायदेशीर सहाय्य आणि समर्थन प्रदान करणे राज्यघटनेचे सखोल आकलन व्हावे यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.








# पूर्णा नगर परिषद प्रशासकीय इमारत नावालाच... शहरात समस्यांचा डोंगर

## मुख्याधिकारी पौळ यांची बदली, नवीन मुख्याधिकारी यांच्यासमोर आव्हान...

**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी-** तत्कालीन नगर विकास मंत्री सध्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पूर्णा नगरपरिषद इमारतीचे थाटामाटात उद्घाटन केले. त्यावेळी एकनाथ शिंदे म्हणाले होते की या नगरपालिकेतून जनतेच्या हिताचे कामे,शहराचा विकास तसेच कामे ही गुणवत्ताधारक, अत्यांत चागल्या प्रकारे व्हावी. ही अपेक्षा व्यक्त केली होती.परंतु पूर्णा शहरातील वातानुकलीत नगरपालिकेची सुसज्ज असलेली प्रशासकीय इमारत नावालाच असल्याचे पहावयास मिळत आहे.

या ठिकाणी अधिकारी, कर्मचाऱ्यावर नियंत्रण नसल्याने सामान्य माणसाचे एकही काही काम होत नाही. एकाही अधिकाऱ्यांचे कर्मचाऱ्यांचे पूर्णा शहरात लक्षच नाही अधिकारी,कर्मचारी नागरिकांना वेठीस धरत आहेत.अधिकारी, कर्मचाऱ्यांची तक्रार देऊनही प्रशासन काहीच करत नसल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

शहरातील पिण्याच्या पाण्याची समस्या, ठिकठिकाणी अंधार,तुबलेल्या नाल्या,अतिक्रमण, मोकाट गाढव,ठीक ठिकाणी खड्डे,बऱ्यचा महिन्यापासून साचलेले पाणी अशा अनेक समस्यांचा खस पडलेला असताना नगरपरिषद पूर्णा याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे.शहरात नको त्या ठिकाणी रस्ते तर महत्त्वाच्या रस्त्याावर खड्डेच खड्डे पाहाव्यास मिळत आहे.

तत्कालीन मुख्याधिकारी युवराज पौळ यांनी नगरपरिषदेच्या शहराच्या विकासासंबंधी लक्ष न दिल्यामुळे अनेक समस्या कायम आहेत. येणारे नवीन मुख्याधिकारी यांच्यासमोर या सर्व समस्यांचा आव्हान आहे. नागरिकांमध्ये पालिका प्रशासनाच्या कारभाराविरुद्ध



संताप व्यक्त केला जात आहे.

या पूर्वी तत्कालीन मुख्याधिकारी युवराज पौळ यांना येऊन तब्बल १५ ते १६ महिने झाले होते.त्यांच्या कार्यकाळात अनेक रस्त्यांची कामे झाली,अनेक विकास निधी आला,त्याा निधीची विल्हेवाटेही लावण्यात आली परंतु त्याा संदर्भात कोणती कामे झाली हे अजूनही अस्पष्टच आहे. मुख्याधिकारी यांच्या काळात करोडो रुपयांची कामे झाली परंतु कामे ही मात्र गुणवत्ताधारक झाले नाही, मुख्याधिकारी,अभियंता व बांधकाम विभागाचे कर्मचारी यांची चौकशी करून कार्यवाही करावी. या कामातून करोड रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे त्याालाा अनेक पक्ष संघटनांनी वेळोवेळी विरोध केला परंतु या विरोधाला न जुमानता निकृष्ट दर्जाची कामे नगरपालिकेने केली आहे. अभियंता व गुत्तेदार व संबंधित अधिकारी कर्मचारी जिल्हास्तरावर हॉटेलमध्ये बसून बिले काढतात त्यांना पूर्णेच्या विकासासंबंधी देणे घेणे नाही. अभियंता नगरपरिषद कार्यालयात कधीच उपस्थित राहत नाही त्याामुळे सामान्य माणसाची कामे होत नाहीत.तसेच बांधकाम परवण्यासाठी वारंवार चक्रा मारूनही कामे होत नाहीत.हे सर्व प्रशासक राज असताना चालू आहे. याप्रकरणी जिल्हाधिकारी यांनी लक्ष द्यावे. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यावर कार्यवाही करावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

मुख्याधिकारी युवराज पौळ यांनी पूर्णा येथे रुजू झाल्यापासून करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केल्यामुळे भ्रष्टाचार उघडीस येईल या भीतीपोटी विनंती बदली करून घेतल्याचे शहरात चर्चा आहे.

# २२ सप्टेंबरला जल्लोष लोककलेचा स्पर्धात्मक महोत्सव

**परभणी,/प्रतिनिधी :** बालरंगभूमी परिषद मुंबई यांच्या वतीने परभणी येथे जल्लोष लोककलेचा हा बालकलावंतांसाठी स्पर्धात्मक महोत्सव रविवारी (दि.२२) सकाळी १० वाजता नांदखेडा रस्त्याावरील वैष्णवी मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन चित्रपट अभिनेत्री तथा बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती शाखेच्या अध्यक्षा नीलम शिर्के - सामंत यांची यांच्याहस्ते होणार आहे. वय वर्षे ६ ते १५ या वयोगटातील बालकलावंतांसाठी लोककला या प्रकारातील समूह नृत्या, समूह गायन, एकल गायन, एकल नृत्या व एकल वादन या स्पर्धा होणार आहेत. यासाठी तब्बल ७५ हजार रुपयांची पारितोषिके देण्यात येणार असून सहभागी होणाऱ्या अव्वल कलाकृतींना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात येणार आहेत.

समूह नृत्या आणि समूह गीत पुरस्कारामध्ये सर्वोत्कृष्ट : ११ हजार रुपये, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र, उत्कृष्ट : ७ हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, उत्तमः ५ हजार रुपये, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र, प्रशंसनीयः(२)- २ हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, एकल कलाकारांना असे पुरस्कार असतील., एकल गीत/ एकल नृत्या/एकल वाद्य, सर्वोत्कृष्टः ३ हजार रुपये, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र, उत्कृष्टः २ हजार रुपये, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र, उत्तमः १ हजार रुपये, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र, प्रशंसनीय :(२) ५०० रुपये, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र दिले जाईल. या महोत्सवात सहभागी होणाऱ्या सर्व बालकलाकारांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या महोत्सवात जास्तीत जास्त बालकलावंतांनी सहभागी व्हावे असे आवाहन बालरंगभूमी परिषद शाखा परभणीचे अध्यक्ष आबा ढोले, उपाध्यक्ष प्रा. नितीन लोहट, कार्याध्यक्ष उपेंद्र दुधगावकर, प्रमुख कार्यवाह त्र्यंबक वडसकर, सहकार्यवाह डॉ. अर्चना चिक्षे, कोषाध्यक्ष संजय पांडे, समन्वयक प्रमोद बल्लाळ, कार्यकारी सदस्य मनीषा उमरीकर, प्रा. किशोर विश्वामित्रे, सचिन आढे, प्रकाश बारबिंड, संदीप राठोड, अनिकेत शेंडे यांच्यासह सर्व बाल रंगभूमी परिषदेच्या सभासदांनी दिली आहे. या महोत्सवात सहभागी होण्यासाठी १८ सप्टेंबरपर्यंत नोंदणी करावी, त्यासाठी त्र्यंबक वडसकर (मो.९९२२११९९९५), संजय पांडे (मो. ९१३०२७३८३३), प्रकाश बारबिंड (मो.९८६००७९००९), राजू वाघ (मो.८६००२ ४७१७१) व संदीप राठोड (मो.९८८१८०७८९०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### रस्त्यावरील धुळ ठरतेय जीवघेणी

**परभणी,/प्रतिनिधी:** शहरातील रस्त्यावरील धुळ ही आरोग्यासाठी मोठया प्रमाणात हाणीकारण अशीच ठरत आहे. त्यामुळे अनेकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. या धुळीचा परिणाम नागरिकांच्या डोंळयावर चांगलाच पडत आहे. प्रशासनाच्यावतीने तसेच महापालिकेच्यावतीने रस्त्यावरील धुळ काढण्यासाठी विशेष उपाययोजनाक रण्याची खरी गरज असतांनादेखील त्यांच्यावतीने कुठलेही प्रयत्न केल्या जात नाहीत.

# तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत संत भगवानबाबा आश्रमशाळा इटोलीचे घवघवीत यश



जिंतूर- क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत तालुकास्तरीय शालेय मैदानी स्पर्धा २०२४ या स्पर्धेत संत भगवानबाबा माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा इटोली ता. जिंतूर या शाळेच्या खेळाडूंनी विविध वयोगटात घवघवीत यश संपादन केले.

या मध्ये धावणे स्पर्धा १) वयोगट १४ वर्ष विवेक विष्णू चव्हाण - १०० मी धावणे सर्वप्रथम,४०० मी धावणे सर्वप्रथम

२) वयोगट १७ वर्ष योगेश त्र्यांबक राठोड -४०० मी धावणे व्दितीय ३) वयोगट १९ वर्ष कृष्णा मारुती राठोड- ८०० मी धावणे सर्वप्रथम,४०० मी धावणे व्दितीय रितेश संतोष चव्हाण - १५०० मी धावणे सर्वप्रथम कृष्णा दासुराव राहुले - २०० मी तृतीय लांब उडी स्पर्धा १) वयोगट १७ वर्ष योगेश त्र्यांबक राठोड - व्दितीय २) वयोगट १९ वर्ष

कृष्णा मारुती राठोड - सर्वप्रथम १०० ४ रीले धावणे स्पर्धा १) वयोगट १९ वर्ष - सर्व व्दितीय

कृष्णा मारुती राठोड कृष्णा दासुराव राहुले योगेश त्र्यांबक राठोड रितेश संतोष चव्हाण सदरील खेळाडूंनी विविध स्पर्धेत यश संपादन करून आश्रमशाळेचे नाव उज्ज्वल केले त्यांच्या या यशाबद्दल मा. सौ गीता गुट्टे मॅडम, सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग परभणी,संस्थेचे अध्यक्ष श्री प्रतापराव घुगे, संस्थेचे सचिव श्री केशव घुगे,संचालक श्री विठ्ठल घुगे,समाज कल्याण निरीक्षक श्री तुकारामजी भराड साहेब, आश्रमशाळेचे प्राचार्य श्री रमेश दराडे आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंदांनी अभिनंदन केले. या खेळाडूंना क्रीडाशिक्षक श्री प्रदीप राठोड सर यांचे मार्गदर्शन लाभले.

### क्रुझर जीप-पलटी होवून १३ प्रवासी जखमी

**परभणी,/प्रतिनिधी:** श्रीगणेश विसर्जन मार्गाची आयुक्त जाधव यांनी केली पाहणी
परभणी,दि.१३(प्रतिनिधी)
: महानगर पालिकेचे आयुक्त धैर्यशील जाधव यांनी शुक्रवारी (दि.१३) शहरातील श्रीगणेश विसर्जनाच्या पूर्वतयारीची पाहणी केली.
शहरातील सुभाष रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, गुजरी बाजार, गांधी पार्क, स्टेशन रोड, नारायण चाळ आदी भागांची पाहणी करून आढावा घेतला. यावेळी त्यांच्यासमवेत तीनही प्रभागांचे सहाय्यक आयुक्त प्रज्ञावंत कांबळे, सोमनाथ बनसोडे, प्रिया गोरखे, शहर अभियंता वासिम पठाण, पवन देशमुख, सोहेल सिद्दिकी, शेख अत्तर, राजकुमार जाधव, रामेश्वर कुलकर्णी, दिपक कानोडे आदी उपस्थित होते.

# मनाची प्रसन्नता टिकविण्याची गरज- डॉ.नाईक

**सेलू,/प्रतिनिधी:** सध्याच्या अस्वस्थ वातावरणात दगदग, ताणतणाव वाढत चालला आहे. त्यामुळे आयुष्य उत्तम प्रकारे जगण्यासाठी आत्मिक शांतता आणि मनाची प्रसन्नता टिकविण्याची नितांत गरज आहे, असे मत मानसोपचारतज्ज्ञ डॉ. जगदीश नाईक (परभणी) यांनी शुक्रवारी ( १३ सप्टेंबर) व्यक्त केले.

सेलू येथील नूतन विद्यालयाच्या सभागृहात आयोजित ६३ व्या गणेशोत्सव व्याख्यानमालेचे पाहिले पुष्प डॉ.नाईक यांनी गुंफले. मन करा रे प्रसन्न हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी मानसोपचारतज्ज्ञ डॉ.प्रकाश आंबेकर (जालना) होते. डॉ.नाईक म्हणाले, '' आदीदैविक आणि आदी भौतिक ताप आपल्या हाताबाहेर आहे. परंतु आत्मिक तापावर नियंत्रण मिळविणे आपल्याला शक्य आहे. आज किरकोळ कारणावरून मनाची घालमेल आणि अस्वस्थता वाढत चालली आहे. त्यामुळे आहे ती परिस्थिती स्वीकारली पाहिजे. काही क्षुल्लक गोष्टीकडे दुर्लक्ष केले पाहिजे. त्यासाठी भावनांवर नियंत्रण राखणे, सकारात्मक दृष्टिकोन ठेवून विवेकाने वागणे आवश्यक आहे.



आणि याची सुरूवात स्वत:पासूनच करावी लागणार आहे.

डॉ.प्रकाश आंबेकर म्हणाले,''धावपळीच्या आणि जीवघेण्या स्पर्धेच्या जगात मनाचा तोल सांभाळता आला पाहिजे. आज दारू आणि अन्य व्यसनांची जागा सततचा मोबाईल आणि वाढत्याा इंटरनेटच्या वापराच्या व्यसनाने घेतली आहे. प्रत्योक कुटुंबाला ही मानसिक आजाराची समस्या भेडसावत आहे. हे वेळीच ओळखणे गरजेचे आहे. आणि दु:ख वाट्याला देणाऱ्या भूतकाळाची आणि भविष्याची चिंता न करता, वर्तमानातील प्रत्योक क्षणाचा आनंद घ्यायला शिकले पाहिजे. जगण्याचा अर्थ गवसला, की जीवन सुंदर होते.'' प्रारंभी दलितमित्र श्रीरामजी भांगडिया यांच्या पुतळ्याला तसेच स्व.गिरीश लोडाया यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक सुभाष मोहकरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.नागेश कान्हेकर यांनी केले. नरेंद्र झाल्टे यांनी आभार मानले. या वेळी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ.विनायकराव कोठेकर, व्याख्यानमालेचे अध्यक्ष संतोष पाटील, चिटणीस अजित मंडलिक यांच्यासह पदाधिकारी, सदस्य, नागरिक, महिला आणि श्रोत्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# नगरोत्थान महाअभियान योजना भागविणार पूर्णा शहराची तहान

**पूर्णा,/प्रतिनिधी:** वाढती लोकसंख्या आणि आटत चाललेले पाण्याचे स्त्रोा यामुळे राज्यात अनेक ठिकाणी पाणी संकट निर्माण झाले आहे. त्याा दुष्काळ सदृश्य परिस्थितीची भर पडली आहे. त्यामुळे पूर्णा शहरातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. त्यासाठी स्थानिक आमदार डॉ.रताकर गुट्टे यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला होता. त्यास अखेर यश आले असून दिग्रस उच्च पातळी बंधाऱ्याच्या जलाशयातून शहरास पाणी पुरवठा केला जाणार आहे.

राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीने २८ फेब्रुवारी रोजी केलेल्या नगरोत्थान महाअभियान अंतर्गत केलेल्या शिफारशीनुसार शहर पाणी पुरवठा योजनेस निधीसह अंतिम मंजुरी देण्यात आली आहे. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे उपअधिक्षक अभियंता मंगेश खैरनार यांनी तसे पत्र पूर्णा नगर परिषदेस पाठवले आहे.

राज्यातील नागरी भागात मूलभूत पायाभूत सुविधा पुरवण्यासाठी व त्यांचा दर्जा वाढविण्यासाठी नगरोत्थान महाअभियान हि योजना राबविली जाते. त्यानुसार विविध शहरात सक्षम पायाभूत सुविधा उभारल्या जात आहेत. त्याचा फायदा शहरवासीयांना होत आहे. सदर योजनेत राज्य सरकार ९० टक्के तर स्थानिक नगर परिषद १० टक्के खर्च करणार आहे.

गेल्या काही वर्षांपासून शहरातील पाणी प्रश्न बिकट बनला आहे. पाणी पुरवठा करणाऱ्या धरणात साठा कमी असल्याने पाणी कपात केली जात आहे. त्यामुळे नागरिक पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. मात्र, या योजनेची अंमलबजावणी झाल्यास पूर्णा शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटण्यास मदत होईल.

दरम्यान, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ मधील कलम १६ नुसार नियोजित सिंचन प्रकल्पातून पिण्यासाठी पंधरा टक्के औद्योगिक क्षेत्रासाठी दहा टक्के व सिंचनासाठी ७५ टक्के क्षेत्रिय वाटप निर्धारित करण्यात आलेले आहे त्याच नियमानुसार हे पाणी वाटप केले जाणार आहे. ..

## अखेर आ.रत्नाकर गुट्टे यांच्या पाठपुराव्यास आले यश

### ...तर मला विशेष आनंद वाटतोय!

**आपल्या पूर्णा शहराचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी गेली काही महिने सातत्याने पाठपुरावा करीत होतो. त्यास महायुती सरकारने सकारात्मक प्रतिसाद देवून योजना मंजूर केली आहे. त्यामुळे लवकरच काम मार्गी लागेल. हि गोड बातमी कानावर येणे, हि माझ्यासाठी समाधानाची गोष्ट आहे, असे स्थानिक आमदार डॉ.रताकर गुट्टे यांनी सांगितले.**



तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ग्रामीण विकासासाठी मूलभूत सुविधा योजने अंतर्गत ५ कोटींचा निधी मंजूर -अर्जुनराव खोतकर

## माजीमंत्री अर्जुनराव खोतकर यांचा विकास कामांचा धडाका सुरूच

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांचा विकास कामाचा धडाका सुरूच असून त्यांनी ग्रामीण भागासाठी स.न.२०२४-२५ या आर्थिक वर्ष तरतुदीनुसार मूलभूत सुविधा योजनेअंतर्गत (२५ १५ १२३८ ) या योजने अंतर्गत जवळपास ०३ कोटी रुपयाचा निधी ग्राम विकास व पंचायत राज विभागाच्या शासन निर्णय क्रं. विकास २०२४ /प्र.क्र.२१४/ योजना ६, दिनांक १३ सप्टेंबर २०२४ नुसार व मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत इमारत बांधणी योजने अंतर्गतखालील गावांना ग्रामपंचायत इमारत बांधकामना मंजुरी मिळाली.

यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतला बांधकामासाठी २० लक्ष प्रमाणे ०१कोटी ७०लक्ष रुपयांचा निधी मिळणार आहे.



यामध्ये प्रामुख्याने मौजपुरी, बोरखेडी, इंदलकरवाडी, गवळीपोखरी, पाहेगाव, धावेडी, खरपुडी, कुंबेफळ सिदखेड, या ग्रामपंचायत चा समावेश आहे ही कामे जि. प. बांधकाम विभागा मार्फत होणार आहे. उर्वरीत निधी अंतर्गत ग्रामीण भागामध्ये विविध ठिकाणी सा.सभागृहाचे कामे मंजूर करण्यात आली असून ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत त्वरित हाती घेण्यात येतील व दर्जेदार केले जाणार आहेत, असे शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकामध्ये म्हटलेले आहे. गेल्या दोन महिन्यांमध्ये अर्जुनराव खोतकर यांनी जालना विधानसभा मतदारसंघांमध्ये विकास कामाचा झपाटा लावलेला असून कोट्यावधी रुपयांची विकासकामासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून घेतलेला आहे .यामध्ये प्रामुख्याने , जिल्हा नियोजन समिती, नगर विकास विभाग ,ग्रामविकास विभाग, अल्पसंख्याक विभाग, रोहयो विभाग , सामाजिक न्याय विभाग आदी विभागातील कामाचा समावेश आहे. जालना विधानसभा मतदारसंघासाठी भरपूर निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री मा. एकनाथरावजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, अजितदादा पवार, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार, रोहयो मंत्री दादा भुसे, पालकमंत्री अतुल सावे यांचे आभार व्यक्त केले.

# आमदार कैलास गोरंट्याल यांचा डबल ढोलकी वाजण्याचा प्रयत्न



## ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांचा आरोप



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

**ओबीसी समाजाच्या आमदाराला एक वेळेस समज देणार आहोत अन्यथा घरचा रस्ता दाखवणार ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांचा आमदार कैलास गोरंट्याल यांना ईशारा दिला आहे, त्यामुळे येणाऱ्या काळात विधानसभेच्या निवडणुकीत आ.कैलास गोरंट्यांल यांच्या अडचणीत नक्कीच वाढ होणार असुन त्याकडे ते कश्याप्रकारे पाहतात हे पाहणे गरजेचे आहे.**

जालन्यात दि.१४ सप्टेंबर रोजी ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी शहरात आयोजीत केलेल्या पत्रकार परिषदेत पुढे बोलतांना सांगितले की, आमची यादी तयार आहे. मराठवाड्यात २५ ते ३० आमदार पाडणार घरचा रस्ता दाखवणार आहोत ओबीसी समाजाच्या आमदाराने मनोज जरांगे पाटीलला भेटण्याचा काम केलं मला हॉस्पिटलमध्ये येऊन भेटायचं मनोज जरांगे पाटलाला हॉस्पिटलमध्ये जाऊन भेटायचं ओबीसीच्या आमदाराला एक वेळेस समज देणार आहोत जालनाचे आमदार कैलास गोरंट्याल डबल ढोलकी वाजण्याचं प्रयत्न करत आहेत एक वेळेस मला भेटायचं दुसऱ्या वेळेस जरंगे पाटलाला भेटायचं आमदार कैलास गोरंट्याल आमच्या आहे म्हणून आम्ही कान टोचण्याचा काम करू आमदार कैलास गोरंट्याल यांना ओबीसी समजत नसेल तर त्यांना घरचा रस्ता दाखवू ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी आज दिनांक १४ सप्टेंबर रोजी दुपारी एक वाजेच्या दरम्यान आयोजित पत्रकार परिषद मध्ये आमदार कैलास गोरंट्याल यांना इशारा दिलाय ओबीसीचे आमदार जरंगे पाटलाला भेटत असेल तर एक अल्टिमेट आणि कान टोचू समज देऊ जरागे जवळचे वाटत असेल तर यांना ओबीसी समाजाने का मतदान करावं डबल ढोलकी आणि भित्र्या माणसाला अजिबात जवळ करू नका असे आवाहन ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी ओबीसी समाजाला केलंय. जर तुमहाला ओबीसी समाजाच्या मतदानाची गरजच नसेल तर तसेही आपण सांगावे आणि जरांगे यांच्या वेठिस रहावे अशीही टिका यावेळी वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत आमदार कैलास गोरंट्याल यांच्यावर केली, यावेळी त्यांच्यासोबत ओबीसी मोर्चाच्या समाजातील पदाधिकारी उपस्थित होते.

# संक्षिप्त

## परतूर शहरातून मोठा शस्त्र साठा जप्त; पोलिसांची कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

आज दि. १४/९/२४ रोजी परतूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक एम. टी. सुरवसे यांना माहिती मिळाली की, परतूर शहरातील काही शिकलकरी यांचे घरी गावठी बंदूक आणि तलवारी आहेत अशी माहिती मिळाल्या वरून परतूर पोलिसांनी अचानक छपा घालून आरोपी नामे १) करतारसिंग उत्तमसिंग पटवा २) सोन्या सिंग प्रेम सिंग ठाकूर दोन्ही रा. साई नगर शिकलकरी मोहला परतूर यांचे घरी चेक केले असता त्यांचे ताब्यातून १) गावठी भर्मार बंदूक -०५, २) धारदार तलवार -०३, ३) कोयता/ सत्तुर-०१, ४) खंजिर -०१, ५) चाकु- ०१, ६) देशी दारू बोत्तल-०९ अशाप्रकारे शास्त्र साठा मिळून आला आहे. असून दोन आरोपीस अटक केली आहे. सदरची कारवाई अजयकुमार बन्सल पोलिस अधीक्षक जालना, पियूष नोपानी अप्पर पोलिस अधीक्षक जालना, दादाहरी चौरे परतूर यांचे मार्गद्शनाखाली एम. टी. सुरवसे पोलिस निरीक्षक पोलिस स्टेशन परतूर, सपोनि जाधव, शिंदे, पोहेका, रामदास फुपाटे पोका विजय जाधव, पॉका गोविंद पवार, पोका राम हाड़े, पोक नितीन बोंडारे, पोक दीपक आढे, पो का अचुत चव्हाण , पो का आंबादाश दांडगे, पोका भागवत खाड़े, पो का गोपानवाड, पो का सुनील पवार , पो का गजानन राठोड, पो का पवन धापसे, पोका वाघ , पो का गायकवांड म पो का/ कल्पना धड़े तसेच होम गार्ड काकडे, अखडे, जाधव, यांनी कारवाई केली आहे.

## पारधसह परिसरातील गावांमध्ये पोलिसांचे पथसंचलन



**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पारध पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये रेणुकाई पिंपळ-गाव, आन्वा, वालसावंगी पारधसह अन्य ठिकाणी जिल्हा पोलीस प्रमुख अजयकुमार बन्सल, भोकरदनचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.गणपत दराडे याच्या मार्गदशाना खाली पोलीस निरीक्षक संतोष माने, व त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी शनिवार दिनांक १४ सप्टेंबर २०२४ रोजी वरील गावामध्ये सकाळी ८ वाजेच्या सुमारास प्रमुख मार्गावरून पथसंचालन केले याप्रसंगी पोलिसांच्या डोक्यावरील हेल्मेट हातातील काठीने नागरीकाचे लक्ष्य वेधले. या प्रसंगी सार्वजनिक गणेश मंडळांनी भयमुक्त, डी.जे.मुक्त, वातावरणात ढोल ताशे अशी वाद्य वाजवून एकोप्याने शांततेत गणेश उत्सव सर्वत्र साजरा करण्याची आवाहन सर्वत्र करण्यात येऊन दिनांक १७ सप्टेंबर वार मंगळवार रोजी गणरायाचे विसर्जन होणार असून पारध व परिसरातील नागरिकांनी शांततेत गणरायाचे विसर्जन करावे असे आवाहन याप्रसंगी पोलीस निरीक्षक माने यांनी केली आहे .

## कु.गायत्री जाधवचे जिल्हास्तरीय स्पर्धेत यश



**तभा वृत्तसेवा**
**माहोरा/प्रतिनिधी**

जालना येथे दिनांक १३ सप्टेंबर २०२४ शुक्रवार रोजी झालेल्या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये प्रशालेची विद्यार्थिनीने विजय संपादन केला.१७ वर्षे वयोगटांमध्ये ( ४९ किलो वजन गट) कु. गायत्री रत्नन जाधव हिने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला असून तिची विभाग स्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.या विद्यार्थिनीचे प्रशालेचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण मोतीराम चेके, जिल्हा परिषद माहोरा शालेय शिक्षण समितीचे उपाध्यक्ष श्री संतोष वरपे , श्री बाळासहेब गव्हले जेष्ठ पत्रकार,शिक्षक पतसंस्था जाफ्राबाद चे संचालक श्री जी .एच पवार सर, क्रीडा विभाग प्रमुख जयकुमार सोनवणे,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन युवकांचा भाजपात प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

सर्वसामान्य कार्यकर्ता हा भारतीय जनता पार्टीचा प्राण असून आज सेवली येथील कार्यकर्ते भाजपामध्ये प्रवेश करीत आहेत याचा आनंदा असून कार्यकर्त्यांच्या बळावरच पक्षाने आज, अगदी लोकसभेच्या दोन जागा वरून सुरुवात करत देशातील सर्वात मोठा पक्ष सलग तिसऱ्यांदा सत्तेत आला असून, प्रधानमंत्री नरेंद्र जी मोदी यांनी गेल्या दोन पंचवार्षिक योजनेमध्ये केलेला भारताचा विकासात्मक कामावर, महाराष्ट्र राज्यात देवेंद्रजींच्या नेतृत्वामध्ये पक्षाने झेप घेतलेली असून, यामध्ये कार्यकर्त्यांचे मोठे योगदान असल्याचे भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी सांगितलेते परतुर येथे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या कार्यालयावर संपन्न झालेल्या प्रवेश सोहळ्याप्रसंगी बोलत होते



पुढे बोलताना ते म्हणाले की माझे मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी सातत्याने परतुर विधानसभा मतदारसंघाचा मोठा विकास केला असून तीनशे गावात डांबरीकरणाचे रस्ते अनेक गावांमध्ये सभा मंडपे गावाला जोडणारी जोड रस्ते वीज वितरण कंपनीचे विणलेले विजेचे जाळे या सगळ्या गोष्टी अत्यंत महत्त्वाचे असून सर्वसामान्यांच्या जीवनामध्ये खऱ्या अर्थाने या विकासाच्या माध्यमातून प्रगती झाली असल्याचे सांगितले यावेळी शेवली येथील कैलास पवार अशोक सदावर्ते निखिल रेंगे आत्माराम सपकाळ रामेश्वर शिंदे किशोर तुपकर साहेबराव शिंदे अविनाश घुले संदीप सदावर्ते संतोष सापले सुरेश शीलवंत विठ्ठल सपकाळ सोनाजी खंदारे, सुरेश पवार कैलास पवार संतोष पवार संदीप पवार दत्ता महाशब्द, संजय पवार कृष्णा तीवरे आदींनी पक्षामध्ये प्रवेश केला यावेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर, जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष संपत टकले, समाधान वाघमारे, गणेश जावळे, सरफराज कायमखानी, नरेश कांबळे, निवृत्ती गोरे, विकास बोडके यांची उपस्थिती होती

# अखेर त्या अवैध गर्भपात करणाऱ्या डॉ.दिलीपसिंग राजपूतची कारागृहात रवानगी

**तभा वृत्तसेवा,**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन येथील अवैध गर्भपात प्रकरण जालना जिल्हा सह महाराष्ट्रभर गाजले. या प्रकरणातील पोलिस कोठडीत असलेल्या डॉ. दिलीपसिंग राजपूत याला गुरुवारी न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली. डॉ. राजपूत याची कारागृहात रवानगी करण्यात आली असून, त्याच्या एजंटांचा शोध घेण्याचे आव्हान एलसीबीसमोर असणार आहे. दरम्यान याच डॉक्टरच्या हाताखाली काम करणारे एजंटांचेही मोठे जाळे देखील आहे. अवैध गर्भपात प्रकरणातील मुख्य सूत्रधार डॉ. दिलीपसिंग राजपूत याला एलसीबीच्या पथकाने जेरबंद केले होते.



न्यायालयाने कोठडी सुनावल्यानंतर त्याची पोलिसांनी कसून चौकशी केली आहे. भोकरदन, येथील प्रकरण जालना जिल्ह्यासह महाराष्ट्रभर गाजले आहे . या प्रकरणातील पोलिस कोठडीत असलेल्या डॉ. दिलीपसिंग राजपूत याला गुरुवारी न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली. डॉ. राजपूत याची कारागृहात रवानगी करण्यात आली असून, त्याच्या एजंटांचा शोध घेण्याचे आव्हान एलसीबीसमोर असणार आहे. दरम्यान याच डॉक्टरच्या हाताखाली काम करणारे एजंटांचेही मोठे जाळे आहे. अवैध गर्भपात प्रकरणातील मुख्य सूत्रधार डॉ. दिलीपसिंग राजपूत याला एलसीबीच्या पथकाने जेरबंद केले होते. न्यायालयाने कोठडी रुग्णालय नवीन ठिकाणी शिफ्ट केल्यानंतर अवैध गर्भपात करणे सुरु केले असून, एक गर्भपातासाठी आठ हजार रुपये घेतले जात असल्याची कबुली डॉ. राजपूत याने कबुली दिल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. विशेष म्हणजे या प्रकरणात आजवर पाच जणांना पोलिसांनी अटक केलेली आहे. परंतु इतर दहा आरोपी पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत त्यात काही एजंटांचाही समावेश आहे. त्यामुळे एजंटांना अटक करण्यासाठी एलसीबीचे एक पथक काम करीत आहे.

# काद्राबाद येथे मानाच्या गणपतीची आरती शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णूभाऊ पाचफुले यांच्या हस्ते सहपत्नी संपन्न

## गणपती बाप्पाच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर मानाचा गणपती येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरातील काद्राबाद येथे गेल्या ७० वर्षापासून मानाचा गणपती बसवल्या जातो जालना शहरात मानाचा गणपती म्हणून ओळख निर्माण झालेली आहे आज दिनांक १४ सप्टेंबर रोजी दुपारी बारा वाजताच्या दरम्यान शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू भाऊ



पाचफुले यांच्या सहपत्नी आरती करण्यात आली यावे गणपती बाप्पाच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर आज गाजराबाद मानाचे गणपती येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलं होतं ५० ते ६० जणांनी रक्तदान केला आहे याचे उद्घाटन शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू भाऊ पाच फुले यांच्या हस्ते करण्यात आलं आहे यावेळी यावेळी राजेंद्र अंबड प्रकाश गोरंट्याल अनुराग अग्रवाल राहुल तालुका ओंकार भुतीया डॉक्टर अशोक पाटेल रमेश दलाल एडवोकेट दर्शित अंबड निखिल अबड जितेश तालुका पांडुरंग खैरे आयुष राठोड शिवराज जाधव आदींची उपस्थिती होती

# कै.जनार्धनसेठ दगडूशेठ औटी यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**माहोरा/प्रतिनिधी**



शुक्रवार दि.१३ सप्टेंबर २०२४ रोजी जनार्धनसेठ ओटी दुःखात निधन झाले मृत्युसमयी त्यांचे वय ७० वर्षाचे होते. औटी यांच्या पश्चात ४ मुले, एक मुलगी नातवंडे सुना असा परिवार असुन जनार्धन औटी यांच्यावर शुक्रवारी दि. १३ सप्टेबर रात्री ८ वाजता श्री रेणुका देवी मंदिर परिसर जवळ करण्यात आले. नातेवाईक आप्तेष्ट व मित्रपरिवार याची उपस्थिती होती. या वेळी गावातील सरपंच, उपसरंपच, शिक्षिक ग्रा.प. सदस्य, डॉक्टर पत्रकार, ग्रामस्थ उपस्थित अंत्यसंस्कार करण्यांत आले.व त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यांत आली.

# कान्हा आयोरे...संग बहारे लायो रे!

## राधा -कृष्णाच्या महारासावर जालनेकरांचा ठेका

### आयुक्त खांडेकरांसह व्यापाऱ्यांच्या हस्ते आरती

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरातील श्री अनोखा गणेश मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त खास जालेकरांसाठी पाचारण केलेल्या हरियाणा राज्यातील सुनील- अनिल तिलकधारी आर्ट ग्रुपच्या कलापथकाने शुक्रवारी ( ता. १३) भगवान श्रीकृष्णांनी वृंदावनात राधा आणि गोपिकांसमवेत केलेला महारास, श्रीकृष्ण- सुदामाची भेट, विष्णू अवतार, मयुर नृत्य, दांडिया सादर करून जालनेकरांना आपल्या तालावर ठेका धरण्यास भाग पाडले. उपस्थित महिला, बालकांनी रंगमंचावर येऊन राधा-कृष्णां सोबत मनमुरादपणे आनंद लुटला.

प्रारंभी प.पू.मनोज महाराज गौड, आयुक्त संतोष खांडेकर, व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विनीत साहनी, हस्तीमल बंब, सतीश पंच, जेपीसी बँकेचे अध्यक्ष संजय भरतिया, जालना मर्चंट्स





बँकेचे अध्यक्ष सी.ए .गोपाल अग्रवाल, उपाध्यक्ष अनिल सोनी,अंकुशराव राऊत,संजय मुथा, अ.भा.मारवाडी संमेलनाचे प्रदेश प्रवक्ता मनीष तवरावाला, दीपक भुरेवाल, विनयकुमार कोठारी, सुनील चौधरी, किशोर देविदान, दिलीप शाह ,श्याम लोया,विजय बगडिया, आदींच्या हस्ते श्रींची महाअ-ारती करण्यात आली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष अनिल गोयल, योगेश मानधना, संस्थापक अजय ( जगदीश) भरतिया, कार्याध्यक्ष संजय अग्रवाल (रूपम),जगदीश मुंदडा, महेश सारस्वत, राजकुमार दायमा (सरकार), राजेश अग्रवाल (रूपम),पुरूषोत्तम भक्कड, हर्षद चोरडिया,गणेश तिवारी, दीपक पंच, अलोक गोरंट्याल, रोहित भुरेवाल, मनोज बंब,गणेश भुरेवाल, भक्तमाल कथा प्रवक्ता किशोरजी तिवारी ,मेघराज चौधरी, सुदर्शन मुंदडा, महावीर मरलेचा, उपस्थित होते. प.पू.मनोज महाराज गौड, आयुक्त संतोष खांडेकर,यांनी श्री अनोखा गणेश मंडळातर्फे दरवर्षी उत्साह आणि जल्लोषात साजरा होत असलेल्या गणेश-ोत्सवातील विविध उपक्रमांचे कौतुक करत सदस्यांना असेच पाठबळ लाभावे अशी प्रार्थना बाप्पांच्या चरणी केली.

मनिष तवरावाला यांनी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसराची अनोखा गणेश मंडळामुळे राज्य आणि देशभर ख्याती पसरली असून महानगरपालिकेने हा परिसर कॉरिडॉर म्हणून विकसित करावा, व्यासपीठ उभारणीसह विकसित झाल्यास परिसरात सातत्याने सांस्कृतिक, धार्मिक उपक्रम होतील. याकरिता प्रशासनास व्यापारी आणि जालनेकरांचे सहकार्य राहील असे त्यांनी नमूद केले. भाविकांना मंडळातर्फे दाळ वाडा प्रसादाचे वाटप करण्यात आले. सुरुवातीस भगवान श्रीकृष्णाच्या आवाहन पर गोपिकांनी नटखट गोकुलके राजा, बंसी बजेगी, राधा नाचेगी, अशी नृत्ये सादर केली. विष्णू अवताराचा जिवंत देखावा यावेळी सादर करण्यात आला.तसेच कलावंतांनी काना मोर बन आयो रे ,,फिरसे अपने संग बहारे लायो रे ...! नंदकाला, मुरलीवाला मटकी मेरी फोडे.., गोकुल की गली मे मच गया शोर ...,आज राधा को श्याम याद आ गया..., अशा एकापेक्षा एक भक्ती गीतांसह देशभक्ती आणि माता-पित्यांवर आधारित नृत्यांचे बहारदार सादरीकरण केले.उत्तरोत्तर रंगत गेलेल्या कार्यक्रमाचा श्री राधे नटखट मोहे मुरली बजाओ. ..,श्याम अपनी मुरली की धुन पे नचाये जा.. नचाये जाये जा..., या गीतांवर महिला आणि बच्चे कंपनीने कलावंतांसमवेत भाग घेत नृत्य करून आनंद लुटला.

### भाऊक सुदामा, आज शिव-पार्वती विवाह!

मोहे जरुरी काम....,कान्हा कहा मिलेंगे...! या गीताने रंगमंचावर एन्ट्री केलेल्या सुदामाने उपस्थित बच्चेकंपनी आणि प्रेक्षकांशी अभिनयाद्वारे थेट संवाद साधत सर्वांना खिळवून ठेवले. श्रीकृष्णाच्या भेटीने आतुर झालेल्या सुदामाची अवस्था कन्हैया हर घडी तुम्हारा इंतजार है... म्हणत पाणाव-लेल्या डोळ्यांनी श्रीकृष्ण- सुदामा भेटीच्या प्रसंगाने संपूर्ण वातावरणात निरव शांतता पसरली, उपस्थितांचे डोळे पाणावले. भाविकांनी कलावंतांना उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. दरम्यान रविवारी ( ता. १५) भगवान शंकराची वरात, शिव-पार्वती विवाह, अघोरी तांडव नृत्य ,महाकाल भस्म आरती असे चित्तथरारक प्रसंग सादर केले जातील. तसेच इडली- चटणी प्रसाद वितरित केला जाणार असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्राथमिक शिक्षक संघाचे प्रलंबीत मागण्यांसाठी जिल्हा कचेरीसमोर धरणे




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**

दोनवेळा जिल्हा परिषदेसमोर प्रलंबीत मागण्यांसाठी अखील महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्यावतीने धरणे आंदोलन केली परंतु आंदोलनाची जिल्हा परिषद प्रशासनाने दखल न घेतल्यामुळे शनिवारपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिक्षकांनी धरणे आंदोलन सुरू केले आहे.

प्राथमिक शिक्षक संघाने दोनवेळा जिल्हा परिषदेसमोर आंदोलन केली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी लेखी आश्वासने दिली परंतु अद्याप एकही मागणी जिल्हा परिषद प्रशासनाने पूर्ण केली नाही. त्यामुळे शिक्षक संघाच्यावतीने आजपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले आहे. शिक्षकांनी दिलेल्या निवेदनात आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करतांना झालेल्या भ्रष्टाचाराबाबत करण्यात आलेल्या चौकशीचा अहवाल संघटनेला देण्यात यावा, विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, अराजपत्रित मुख्याध्यापक, उच्चश्रेणी मुख्याध्यापकांच्या रिक्त पदावर समुपदेशन पध्दतीने पदोन्नत्या करण्यात याव्यात, प्रलंबीत शिक्षकांना निवड श्रेणीचा लाभ त्वरीत देण्यात यावा, पात्र प्राथमिक शिक्षकांना विषय शिक्षक म्हणून दर्जोन्नती द्यावी, डीसीपीएस धारक शिक्षकांच्या कपात रकमेचा हिशोब त्वरीत देण्यात यावा, गेल्या तीन वर्षापासून राहीलेल्या जिल्हा पुरस्काराचे त्वरीत वितरण करण्यात यावे, शाळा अनुदान व सीआरसी अनुदान अद्याप का मिळाले नाही याची चौकशी करण्यात यावी, आंतरजिल्हा बदलीने मार्च २४ मध्ये रूजू झालेल्या शिक्षकांचा अडीच महीन्याचा पगार त्यांना अदा करण्यात यावा आदी मागण्यांचा निवेदनात समावेश असून या मागण्या मान्य होईपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहणार असल्याचे शिक्षक संघटनेच्यावतीने सांगण्यात आले आहे. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष व्ही डी देशमुख, सरचिटणीस हरिभाऊ मुटकुळे, कार्याध्यक्ष जी एस खिल्लारी, कोषाध्यक्ष रमेश सुर्यवंशी, एल एन वाव्हळ,के व्ही खंडोमलके, एस डी पाटील, ए एल पवार, जी एस नागभुजंगे, बी एल माखणे, आर व्ही उडंगे, एस व्ही तोंडे, एच व्ही नीळकंठे, बी डी कोल्हे, आर एम व्यवहारे, एस एम जाधव, प्रकाश नीळकंठे, व्ही ई आरू, जी बी पायघन, बी डी साखरे, पी पी कावरखे, आर पी कावरखे, एस बी कांबळे, एच व्ही चव्हाण, एस एस रणवीर, बी एस आसोले, ए एक वाकोडे, ए एस गायकवाड आदींचा समावेश आहे.

# चिंतामणी संस्थानकडून १ लाख ५१ हजार मोदकांचे वाटप होणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**



राज्यासह परराज्यात मोदकाचा गणपती म्हणून प्रसिध्द असलेल्या श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीच्या दर्शनासाठी देशभरातून सुमारे २ लाखांपेक्षा जास्त भाविक येण्याचा अंदाज असून संस्थानकडून १.५१ लाख नवसाचे मोदक वाटप केले जाणार असल्याची माहीती संस्थानचे सचिव दिलीप बांगर यांनी दिली आहे. रक्तदान करणाऱ्यांना थेट विघ्नहर्ता चिंतामणीचे दर्शन मिळणार असून यावर्षी स्तनदा मातांसाठी आठ ठिकाणी हिरकणी कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

अनंत चर्तुदशीच्या दिवशी नवसाचा मोदक दिल्या जातो. त्यानंतर नवस पूर्ण झाल्यानंतर १००१ मोदक गणपतीला अर्पण केल्या जातात. दरवर्षी अनंत चर्तुदशीला मोदक घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होते. मंगळवार दि १७ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता संस्थानच्या विश्वस्तांच्या उपस्थितीत महाआरती झाल्यानंतर नवसाच्या मोदकाचे वाटप केले जाणार असून यावर्षी १ लाख ५१ हजार मोदकांचे वाटप केले जाणार आहे. गणेश चतुर्थीपासूनच दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. यावर्षी अनंत चर्तुदशीला सुमारे २ लाखांपेक्षा जास्त भाविक दर्शनासाठी येण्याचा अंदाज आहे. त्यानुसार संस्थानकडून तयारी पूर्ण करण्यात आली आहे. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या पथकाने या भागात पाहणी केली असून ठिकठिकाणी पोलिस बंदोबस्त तैनात केला जाणार आहे. नगर पालिकेकडून स्वच्छतेसाठी सर्वच साफसफाई कर्मचारी दिवसभर मदतीला असणार आहेत. आरोग्य पथकही कार्यरत राहणार आहे. शासकीय रूग्णालयात रक्त बाटल्यांचा तुटवडा लक्षात घेता रक्तदान शिबीराचे आयोजन केले आहे. या शिबीरात रक्तदान करणाऱ्या भाविकांना थेट चिंतामणीचे दर्शनाचा लाभ मिळणार आहे. ज्येष्ठ नागरीक, दिव्यांग, गरोदर माता यांना थेट दर्शनाची व्यवस्था करण्यात आली आहे. पावसाची शक्यता लक्षात घेता वॉटरप्रुफ मंडप उभारण्यात आला आहे.

हिंगोली शहरातील दानशूर व्यक्ती, व्यापारी, सेवाभावीसंस्था, व्यायामशाळांच्यावतीने भाविकांच्या चहापाणी, नाश्ता तसेच भोजनाची व्यवस्था केली जाणार आहे. भाविकांच्या वाहतुकीसाठी ऑटो संघटनेकडून मोफत वाहतुक केली जाणार असल्याची माहीती संस्थानचे सचिव दिलीप बांगर यांनी दिली आहे.

# पोलिस प्रशासन, पालिकेच्यावतीने गांधी चौकात कार्यवाही

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**



महात्मा गांधी चौकातील हातगाडे, ऑटोचालक यांच्या दादागिरीला कंटाळून व्यापारी महासंघाने बंद पुकारण्याचे आवाहन केले होते परंतु पोलिस अधीक्षक यांच्या आश्वासनानंतर व्यापारी महासंघाने बंद मागे घेतला. शनिवारी येथील महात्मा गांधी चौकात पोलिस प्रशासन आणि पालिका प्रशासनाने हातगाडे चालक, ऑटोचालक यांना समज देत रस्त्यावर आल्यास कडक कार्यवाहीचा इशारा देत चौक मोकळा केला.

व्यापारी महासंघाच्यावतीने शुक्रवारी जिल्हाध्यक्ष गजानराव घुगे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली होती. यावेळी व्यापाऱ्यांच्या दुकानासमोर गाडे आणि ऑटो उभे करणाऱ्यांविरोधात तसेच व्यापारी गोविंद मुंदडा यांना झालेल्या मारहाणीचा निषेध करीत शनिवारी बंदचे आवाहन करण्यात आले होते परंतु पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी व्यापाऱ्यांची बैठक घेत संबंधीतांवर कार्यवाहीचे आश्वासन दिले होते. त्यानुसार शनिवारी पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर, वाहतुक शाखेचे पोलिस कर्मचारी तसेच नगर पालिकेचे स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, आकाश देशमुख, दिनेश वर्मा यांच्या पथकाने गांधी चौकातील फळविक्रेते तसेच ऑटोचालक यांना व्यापाऱ्यांच्या दुकानासमोरून हटवून रस्त्याच्या एका बाजूला वाहने उभी करण्यास भाग पाडले. या कार्यवाहीमुळे जवाहर रोड, गांधीचौक, इंदिरा चौक, महावीर चौक येथील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे. फळविक्रेते आणि ऑटोचालकांना निशिचत जागा दिली असून रस्त्यावर गाडा अथवा वाहने उभे करणाऱ्याविरूध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार असल्याचे पोनि पाडळकर यांनी सांगितले.

# आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पथसंचलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ७ सप्टेंबर**



पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर यांच्या ३५०व्या स्मृती वर्षा निमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे बाल संगम व पथसंचलन दि १५ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आले आहे.

या संगमाचे एकत्रीकरण जिल्हा परिषद शाळा मैदानावर सकाळी १० वाजता होणार आहे. त्यानंतर तेथुन पथसंचलन निघणार आहे. पथसंचलन शहराच्या मुख्य मार्गावरून पदक्रांत करणार आहे. तसेच या संचालनाचा समारोप आणि बौद्धिक कार्यक्रम दुपारी १२ वाजता जिल्हा परिषद शाळा मैदानावर होईल. या संगमास वय १२ ते १७ वर्ष वयोगटातील (वर्ग ७ वी ते १२ वी ) बाल स्वयंसेवक भाग घेऊ शकतील. पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर यांच्या जीवनाचा आदर्श आणि त्यांच्या कार्याची ओवी लक्षात घेऊन हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे संवर्धन आणि हिंदुचे शक्ति प्रदर्शन करण्याचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जिल्हा हिंगोली यांच्यातर्फे सर्व हिंदू बांधवांनी या संगमामधे व बौद्धिक कार्यक्रमास सहपरिवार उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### म. ज्योतिबा फुले योजनेच्या प्रलंबीत लाभार्थ्यांनी आधार प्रमाणीकण करण्याचे आवाहन

हिंगोली- महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र ठरलेल्या (विशिष्ट क्रमांक देण्यात आलेल्या ) परंतु आधार प्रमाणिकरण न झालेल्या शेतकऱ्यांसाठी महाआयटी यांनी दि. १२ ऑगस्ट ते दि. ७ सप्टेंबर, २०२४ पर्यंत आधार प्रमाणिकरणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. अद्यापही २५१ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणिकरण शिल्लक असल्यामुळे दि. १८ सप्टेंबर, २०२४ पर्यंत आधार प्रमाणिकरणाची सुविधा सुरु राहणार आहे. या काळात संबंधित शेतकरी बांधवानी आधार प्रमाणिकरण करुन घ्यावे. यादीतील पात्र शेतकरी आधार प्रमाणिकरण कालावधीत मयत झाले असल्यास त्यांच्या वारसांची नोंदी संबंधित बँकेत तातकाळ करुन घ्यावेत. याबाबत बँकानी यापूर्वी पोर्टलवर अपलोड केलेल्या मयत खात्यांच्या डिलीशेनची सुविधा दि. १७ सप्टेंबर, २०२४ पर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच मयत खातेदारांच्या वारसांची नोंद घेऊन बँकाना खाती अपलोड करण्याची सुविधा दि. १८ सप्टेंबर ते २६ सप्टेंबर, २०२४ या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. हिंगोली जिल्ह्यातील महात्मा ज्योतीबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या लाभासाठी आधार प्रमाणिकरण प्रलंबित असलेल्या पात्र लाभार्थ्यांनी आधार प्रमाणिकरण करुन घ्यावेत, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, हिंगोली यांनी केले आहे.

### छत्रपती संभाजी नगरमध्ये भरती मेळावा

हिंगोली- मराठवाडा पर्यावरण बटालियन, १३६ इन्फंट्री बटालियन टीए इको, महार (एमओइएफ आणि सीसी) आणि महाराष्ट्र राज्य व विभागाच्या माजी सैनिक आणि माजी महिला कर्मचाऱ्यांच्या (अकाली निवृत्तीसह) भरतीसाठी छत्रपती संभाजीनगर येथील मिल्ट्री कँट येथे दि. २३ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर, २०२४ या कालावधीत माजी सैनिक आणि माजी महिला कर्मचाऱ्यांसाठी (समाविष्ट महिला) भरती मेळावा आयोजित करण्यात आला आहे. १३६ इन्फंट्री बटालियन टीए इको, महामध्ये सहभागी होण्यासाठी स्वयंसेवा करणारे सर्व पात्र उमेदवार दिलेल्या वेळापत्रकानुसार दि. २३ सप्टेंबर, २०२४ रोजी संभाजीनगर मिलट्री कैंट (सर्वत्र स्टेडियम) येथे ५.३० वाजता शारीरिक फिटनेस चाचणीसह भरती सुरु होणार आहे. संभाजीनगर मिलट्री कैंट (सर्वत्र स्टेडियम) येथे दि. २३ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर, २०२४ या कालावधीत सोल्जर जीडी, क्लार्क, हाऊस कीपर, ब्लॅकस्मिथ, मेस कीपर, आर्टीशियन (डब्ल्यूडब्ल्यू), स्टेवार्ड अशी एकूण ५३ पदे भरण्यात येणार आहेत. सोल्जर जीडी या पदासाठी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणे आवश्यक आहे. तर उर्वरित सर्व पदासाठी संपूर्ण भारताचा रहिवाशांना सहभागी होता येणार आहे. या भरतीसाठी उमेदवारांसाठी संपर्क क्रमांक ९१६८१६८१३६ हा आहे. तसेच या भरतीच्या अटी व शर्ती तसेच अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, हिंगोली यांच्या कार्यालयाशी संपर्क साधता येईल.

# स्कुटीच्या डिक्कीतून ४० हजार रोख, ३.३८ लाखांचे दागिने पळविले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**

शहरातील भर चौकातील एका पावभाजी सेंटरसमोर उभ्या असलेल्या स्कुटीच्या डिक्कीतून चोरट्यांनी ४० हजार रूपये रोख आणि ३ लाख ३८ हजारांचे मुद्देमाल अवघ्या वीस मिनिटात चोरट्यांनी पळविले. याप्रकरणी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार येथील राज्य राखीव दलातील जवान दादाराव कांबळे हे कुटुंबियांसह शुक्रवारी सकाळी स्कुटीवर हिंगोली शहरात आले होते. यावेळी भारतीय स्टेट बँकेतून ५ लाख रूपयांची रक्कम काढली. त्यानंतर त्यातील काही रकमेतून सराफा बाजारातून दागिने घेतले. त्यानंतर उर्वरित रकमेतून त्यांनी बुलढाणा बँकेत तारण ठेवलेले सोन्याचे दागिने सोडवून घेतले. दरम्यान, यावेळी त्यांनी त्यांच्या स्कुटीच्या डिक्कीत उर्वरित ४० हजार रूपये आणि १ लाख ९२ हजार रूपये किंमतीचे ३५ ग्रॅम सोन्याचे गंठन तसेच १ लाख ४५ हजार रूपये किंमतीच्या १९ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या अंगठ्या असा ३ लाख ७८ हजार रूपयांचा मुद्देमाल ठेवला होता. त्यानंतर काही अंतरावर असलेल्या महावीर पावभाजी सेंटर येथे नाश्ता करण्यासाठी आले होते. दुपारी एक वाजण्याच्या सुमारास त्यांनी स्कुटी पावभाजी सेंटरच्या समोर उभी केली. त्यानंतर वीस मिनीटातच ते नाश्ता करून परतले असता त्यांना स्कुटीची डिक्की उघडी दिसली. त्यामुळे डिक्कीची तपासणी केली असता त्यातील रोख रक्कम आणि दागिने चोरीला गेल्याचे आढळले. या प्रकारानंतर त्यांनी तातडीने हिंगोली शहर पोलिस ठाण्यात माहीती दिली. पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर, जमादार अशोक धामणे, संभाजी लेकूळे, धनंजय क्षीरसागर, पोटे यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देत पाहणी केली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही तपासण्यास सुरूवात केली आहे.

# कृषी सुवर्ण समृध्दीनिमित्त २३ सप्टेंबरला तोंडापूरला शेतकरी मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**

कळमनुरी तालुक्यातील तोंडापूर येथील कृषि विज्ञान केंद्रात दि. २३ सप्टेंबर, २०२४ रोजी कृषि सुवर्ण समृध्दी आठवडा साजरा करण्यात येणार आहे. या आठवड्याच्या सुरुवातीला एका शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे.

या मेळाव्याचे उद्घाटन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते होणार असून या मेळाव्याला वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु प्रो. डॉ. इंद्रमणी हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून खासदार नागेश पाटील आष्टीकर, माजी खासदार ड. शिवाजीराव माने उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे सचालक संशोधन डॉ. खिजर बेग, ज्वारी संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. एल. एन. जावळे, मिलेट मिशन नवी दिल्ली येथून राकेश सिन्हा, मिलेट मॅन ऑफ आंध्र प्रदेश श्री वीर शेट्टी व भारतीय अन्न संशोधन संस्थान, हैदराबाद येथील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. राजेंद्र चापके यांचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना मिळणार आहे.

या कार्यक्रमाच्या वेळी प्रदर्शनाचे सुद्धा आयोजन करण्यात आले असून या प्रदर्शनामध्ये भरड धान्याच्या बियाण्याची विक्री सुद्धा करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे भरड धान्यापासून तयार होऊ शकणाऱ्या पदार्थाचे प्रदर्शन सुद्धा लावले जाणार आहे. मानवी आरोग्याच्या दृष्टिकोनातून भरडधान्याचे महत्त्व मागच्या वर्षी आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष साजरे करून सांगण्यात आलेले आहे. त्या दृष्टिकोनातून हे संपूर्ण दशक हे भरड धान्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी साजरे करण्याचा कृषी विज्ञान केंद्राचा मानस आहे.

या कार्यक्रमास सर्व शेतकरी आणि शेती विषयक काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांनी या मेळाव्यामध्ये उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा आणि हिंगोली जिल्ह्यामध्ये हळद सोयाबीन आणि हरभरा या पिकांसोबतच रब्बी ज्वारीचा पेरा आणि उत्पादकता वाढवण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन कृषी विज्ञान केंद्रातर्फे करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय पोषण अभियानात हिंगोली जिल्हा राज्यात अव्वल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली १४ सप्टेंबर**

राज्यात राष्ट्रीय पोषण अभियानांतर्गत पहिल्या पंधरवाड्यात हिंगोली जिल्ह्याने नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून त्याची ऑनलाईन नोंद घेत राज्यात अव्वल क्रमांक मिळवला आहे. मागील वर्षी या अभियानात हिंगोलीने राज्यात चौथा क्रमांक पटकाविला होता.

राज्यात महिला व बाल कल्याण विभागाच्यावतीने अंगणवाड्यांमधून पोषण माह सुरू आहे. त्या निमित्ताने राष्ट्रीय पोषण अभियानांतर्गत दररोज अंगणवाड्यांमधून विविध उपक्रम राबवले जात असून या उपक्रमांची ऑनलाईन नोंद घेतली जात आहे. राज्यातील सुमारे १ लाख अंगणवाड्यांमधून हा उपक्रम राबवला जात आहे. यामध्ये अंगणवाडीतील बालकांना विविध पोषण रॅली, पोषण वाटीका तयार करणे, स्क्रिनींग राबवणे, घरोघरी योग, गरोदर महिलांची ॲनीमिया तपासणी, आहाराबाबत समुपदेशन, पाणी स्वच्छतेचे महत्व यासह इतर उपक्रमांचा समावेशआहे.

दरम्यान, हिंगोली जिल्ह्यात जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ, बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी सहा प्रकल्पांतील अंगणवाड्यांमधून उपक्रम राबविण्यास सुरूवात केली आहे. महिला व बाल कल्याण विभागाच्या आयुक्त कार्यालयाने ठरवून दिलेल्या उपक्रमांसोबतच इतर नावीन्यपूर्ण उपक्रम अंगणवाड्यांमधून राबविले जात आहेत. या उपक्रमांची माहीती व छायाचित्र देखील ऑनलाईन अपलोड केले जात आहेत. हिंगोली जिल्ह्यातील सुमारे १ हजार अंगणवाड्यांमधून पहिल्या पंधरवाड्यात ६९ हजार ऑनलाईन नोंदी घेण्यात आल्या आहेत. या उपक्रमांची माहीतीही पालकांना दिली जात असून त्याना स्वच्छता व बालकांची काळजी या विषयावर मार्गदर्शन केले जात आहे.

दरम्यान, हिंगोली जिल्ह्याने पहिल्या पंधरवाड्यात राज्यात पहिला क्रमाक मिळवला आहे. जिल्ह्यात राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची गती कायम ठेवून त्याच्या नोंदी घेत दुसऱ्या टप्प्यातही राज्यात प्रथम क्रमांक मिळविण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी गणेश वाघ यांनी सांगितले.

# आज शहर भाजपच्यावतीने मोफत आरोग्य शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १४ सप्टेंबर**

भारतीय जनता पक्ष शहर कार्यकारणीच्यावतीने येथील रिसाला बाजार, गणेशवाडी गारमाळ, कांचन नगर, भाग्यनगर, आशीर्वाद नगर, श्रीनगर, विठ्ठल कॉलनी, बंजारा कॉलनी या भागातील नागरिकांसाठी दि १५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत अथर्व लॉन येथे मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

भाजपचे आ.तान्हाजीराव मुटकुळे यांच्या संकल्पनेतून आणि सौजन्यातून विविध शासकीय योजनांचे निशुल्क नोंदणीकरण आणि मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीराचे उद्घाटन आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्याहस्ते होणार आहे. यावेळी माजी खा ॲड शिवाजीराव माने, भाजपचे जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी आ. रामराव वडकुते, माजी आ. गजाननराव घुगे आदीची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी महिलांच्या मेळाव्याला सकाळी ११.०० वा आमदार तान्हाजीराव मुटकुळे हे प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. या भागातील सर्व पात्र लाभार्थी नागरिकांनी विशेषता महिलांनी आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन शहराध्यक्ष कैलाशचंद्र काबरा,महिलामोर्चाच्या शहराध्यक्षा अल्का लोखंडे यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# विमानतळ सुरक्षा पथकाचा कारभार कॉन्स्टेबलच्या हाती

## तीन वेळा बदली होवुनही तळ ठोकुन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १४ सप्टेंबर -**

विमानतळ सुरक्षा पथकातील कारभाराविषयी तरुण भारत मध्ये नुकतेच वृत्त प्रकाशित करण्यात आले होते. वृत्त प्रकाशित झाल्यानंतर या ठिकाणी होत असलेल्या त्रासाला कंटाळलेल्या अनेकांनी तरुण भारतशी संपर्क साधून व्यथा मांडल्या. तसेच या ठिकाणी सुरू असलेले अनागोंदी कारभाराचा पाढाच वाचला असून येथील सर्व कारभार एका कॉन्स्टेबलच्या हाती असल्याचे त्यांच्या माहितीवरून उघड झाले. हजेरी मेजरची जबाबदारी हेड कॉन्स्टेबल किंवा जमादार यांना देण्याऐवजी कॉन्स्टेबल कडे देण्यात आली असून या कॉन्स्टेबलची देखील या ठिकाणी कार्यरत सहाय्यक पोलीस निरीक्षकाप्रमाणेच तीन वेळा बदली झाली असल्याचे त्यांच्या माहितीवरून उघड झाले.

विमानतळ सुरक्षा पथकात मंजूर संख्याबळापेक्षा केवळ ३५ पोलीस कर्मचारी कार्यरत असून यामुळे कर्मचाऱ्यांना १५ ते १६ तास कर्तव्य बजवावे लागत आहे. त्यातच येथील अधिकाऱ्यांनी आपला मनमानी कारभार सुरू केला असून अधिकारी दोन शिफ्ट मध्ये कर्तव्यावर तर कर्मचाऱ्यांना पंधरा ते सोळा तास कर्तव्यावर जुंपण्यात येत असल्याने कर्मचारी नाराजी व्यक्त करीत आहेत.

विमानतळ सुरक्षा पथकात एकूण ५७ संख्या बळ मंजूर आहे. तर या संख्येप्रमाणेच या ठिकाणी मनुष्यबळ कार्यरत होते. परतू विमानसेवा कधीच सुरु होणार नाही अशी आशा असलेल्या येथील सहाय्यक पोलिस निरीक्षकांनी संख्याबळाची गरज नसल्याचे सांगुन मागील वर्षी २५ जणांना कमी केले. त्यामुळे या ठिकाणी आता केवळ ३५ कर्मचारी कार्यरत आहेत. कमी कर्मचाऱ्यांमुळे या ठिकाणी कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडत असुन त्यांना १५ ते १६ तास कर्तव्य बजवावे लागत आहे तर वरीष्ठ अधिकारी आपल्या मर्जीप्रमाणे दोन शिफ्ट मध्ये कर्तव्य बजावत आहेत.

दरम्यान या ठिकाणी कार्यरत असलेल्या एका कॉन्सटेबलच्या इशाऱ्यावर विमानतळ सुरक्षा पथकाचा कारभार सुरु असल्याचे उघड झाले आहे. येथील महीला सहाय्यक पोलिस निरीक्षकयांची दोन वेळा बदली झाली असुन वरीष्ठांचे आर्शीवाद व राजकिय वरदहस्तामुळे त्या याच ठिकाणी तळ ठाकुन आहेत. तर सहाय्यक पोलिस निरीक्षकांच्या आर्शीवादामुळे कॉन्सटेबल तळ ठोकुन असुन या कॉन्सटेबलची देखील तीन वेळा बदली झाली असल्याची माहीती आहे.

# महादेव मंदिरातील दानपेटी फोडणाऱ्या चोरट्यांना अटक




**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. १४ सप्टेंबर -**

नायगाव तालुक्यातील मांजरम येथील महादेव मंदिरातील दानपेटी फोडुणा-या चोरट्यानां नायगांव पोलीसांनी ४८ तासाच्या आत अटक करून न्यायालयीन कोठडीत पाठविले असल्याने नायगांव पोलीसांच्या या कारवाई बदल पोलीस अधीक्षक अभिनाश कुमार यांनी नायगांव पोलीसांचे अभिनंदन केले आहे.

गेली अनेक वर्षांपासून नायगांव शहरासह नायगांव पोलीस ठाण्याच्या हादीतील चोर-यांचा तपास लागत नव्हता त्यामुळे नागरिक चांगलेच वैतागले होते. एक आठवड्या पुर्वी नायगांव पोलीस ठाण्याचा पदभार पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनी स्वीकारताच मांजरम येथील महादेव मंदीराची दानपेटी १० सप्टेंबर ला चोरट्यानी फोडुन आंदाजे ३० हजार रुपये चोरून नेल्याप्रकरणी सुभाष हावगीर बोमनाळे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दखल करण्यात आला होता.

पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांना खब-याकडुन मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी एक पथक तयार करून यातील आरोपी. बाजीराव गोविंदराव शिंदे (वय ३२), गोविंद विठ्ठल शिंदे,(वय३६), शरद धनराज शिंदे (वय २२) यांना ताब्यात घेऊन विचारपुस केली असता गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. त्यांच्याकडून १५ हाजाराचा मुद्देमाल जप्त करून नायगांव येथील न्यायालयात हजर केले असता त्यानां न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रकाश पंडित,पोलीस उपनिरीक्षक भिमराव कदम , पोहेका गणपत पेदे, बाबुराव चरकुलवार, बालाजी शिंदे, बालाजी बामणे नायगांव पोलिसांनी ४८ तासाच्या आत तपास लावल्याने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, पोलीस उपअधीक्षक संकेत गोसावी यांनी कौतुक केले.

## संक्षिप्त वृत्त

### भोकर विधानसभा निवडणुक लढवण्यासाठी वंचित कडून अ‍ॅड. कमलेश चौदंते इच्छुक

**मुदखेड** -येत्या काही महिन्याच्या आत विधानसभेची निवडणूक होणार असून त्यात भोकर विधानसभेसाठी वंचित बहुजन आघाडीकडून माजी नगरसेवक अ‍ॅड. कमलेश चौदंते यांनी पक्षाकडे रीतसर विधानसभेसाठी मागणी केली असल्याची माहिती दि.१३ सप्टेंबर रोजी मुदखेड येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगतिले पुढे बोलताना आपली भूमिका स्पष्ट करत निवडून आल्यास समाजातील वंचित ,उपेक्षित, अल्पसंख्याक ,बहुजन सह इतर सामाजिक घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही दिली. भोकर विधानसभेसाठी वंचित बहुजन आघाडी पक्षाकडून एकमेव अँड तथा माजी नगरसेवक कमलेश चौदंते यांनी केली , उपस्थित स्थानिक पत्रकारांशी संवाद करत विचारलेल्या प्रश्नांना उत्तरं देताना अँड कमलेश चौदंते यांनी विधानसभा मतदारसंघातील सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी लघु उद्योग उभारण्यासाठी अर्थ सहाय्य उपलब्ध करत रोजगार निर्मितीसाठी आवश्यक उपाय करण्यात येईल ,विधानसभेतील शेतकऱ्यांसाठी शेतीमध्ये उत्पन्न वाढी शेतीपूरक आधूनिक पद्धतीद्वारे शेती विकास आणि शेती उदिष्ट पूर्ती करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले, वास्तविक स्थितीमध्ये महिलांसाठी सामाजिक सुरक्षा रक्षक म्हणून योग्य ते पावले उचलून सामाजिक सुरक्षा आणि महिला सन्मान देण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे यावेळी नमूद केले, नांदेड जिल्ह्यात एका राजकीय पक्षाच साम्राज्य नष्ट करत विधानसभेतील सामान्य गरीब कुटुंबातील भूमिपुत्रावर विश्वास करत मतदारसंघातील अपूर्ण, रखडलेले आणि प्रलंबित विकास कार्य पूर्ण करण्यासाठी एकदा निवडून देण्याचा आवाहन पत्रकार परिषदेच्या माध्यमातून अँड कमलेश चौदंते यांनी व्यक्त केले आहे.या प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे माजी संपर्क प्रमुख राहुल चौदंते, अ‍ॅड समीर पठाण, अँड बाबसाहेब चौदंते, बाळु राऊत, अँड अमोल भुरे, राजू चौदंते, निखिल चौदंते आदींची प्रमुख उपस्थिती होती.

### उमरी दुय्यम निबंधक पदमवार यांचा आर्य वैश्य समाजाच्या वतीने सत्कार

**उमरी**-उमरी शहरात रुजू झालेले दुय्यम निबंधक व्हि.बी. पदमवार यांचा आर्य वैश्य समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला आहे. उमरी शहरातील प्रथम श्रेणी दुय्यम निबंधक कार्यालयात दुय्यम निबंधक म्हणून पदमवार हे रुजू झाले आहेत. त्यांचा आर्य वैश्य समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गोविंद नलवलवार, जयप्रकाश तम्मेवार, बालाजी येरावार, पांडुरंग लापशेटवार, मनोज कोटगिरे, किशोर पबितवार 'गोविंद महाजन, अशोक मामीडवार, नरेंद्र येरावार, संतोष शिरूरकर, अनिल नगनुरवार यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

### लिंबोटी येथे मोफत रोगनिदान शिबिर

**लोहा**- लिंबोटी येथील अभी वाघमारे लिंबोटीकर यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत रोगनिदान शिबिराचे आयोजन करून ३०० रुग्णांची तपासणी करण्यात आली.सामाजिक कार्यकर्ते अभिभाऊ वाघमारे लिंबोटीकर यांच्या वाढदिवसानिमित्त नुकतेच भव्य मोफत रोगनिदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. सदरील शिबिरास लोहा व कंधार तालुक्यातील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ मिलिंद धनसडे, रमाकांत केंद्रे, मेडिकेअर मल्टीस्पेशालिटीचे संचालक आनंद धनसडे, भीमकीर्तीराज कलंबरकर, वामन दासरे, भीमा सावकर मलशेट्टे, बि. जी. वाघमारे, राजर्षी चे आर. जी. वाघमारे, सतीश कदम, संभाजी गाडगे, राजगुरू दासरे, आरोग्य कर्मचारी अनवर पठाण आदींची उपस्थिती होती.

### सोनखेड येथे गौरी पूजनच्या दिवशी चोरी २लाख ४५ हजार रुपये घेऊन चोरटे पसार

**सोनखेड** -येथील पोलीस ठाण्याच्या समोर वीस ते पंचवीस फुटावर असलेले बाजार मैदान व सराफा लाईन ला असलेले संतोष किराणा दुकानात काल दिनांक ११रोजी रात्री अंदाजे २.४५ वाजण्याचे सुमारास अज्ञात चोरट्यानी दुकानाच्या मागील भागातील पतरा खिडकीच्या साईज चा कापून आत मध्ये प्रवेश केला व दुकानातील महाग वस्तू जसे जर्दा सिगारेट गोल्ड फ्लॅग अशा महागड्या वस्तू पिशवीत भरल्या व गल्लयातील रोख रक्कम १ लाख ४५ हजार व माल असे मिळून २ लाख ४५ हजार चोरला सदरील घटना ही दुकानातील कॅमेऱ्यात कैद झाली असून घटनेची माहिती मिळताच सपोनि पांडुरंग माने व बिट जमादार विशवनाथ हंबर्डे घटनास्थळी पोहचले व श्वान पथक व फॉरेन्सिक टीम ला पण पाचरण करण्यात आले चोरांच्या बोटाचे ठसे काही वास्तुवर असल्याने ते घेण्यात आले असल्याची माहिती मिळाली आहे दुकान मालक राजेश शंकरराव मोरे यांच्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्या विरुद्ध गु र क्रमांक १६३/२०२४ कलम ३५१(४), ३०५(१) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास स पो उपनिरीक्षक वैशाली कांबळे हया करीत आहेत सोनखेड येथे भर बस स्टॉफ वर किराणा दुकान फोडण्याची ही तिसरी घटना असून प्रत्येक वेळी दुकान फोडण्याची पद्धत सारखीच आहे या अगोदर शेख बाबुमिया यांचे दुकानातं दोन वेळेस याच पद्धतीने चोरी झाली व लाखो रुपयाचा माल चोरीस गेला नंतर बाजार मैदानातील श्री बालाजी किराणा मध्ये त्याच पद्धतीने चोरी झाली आणी लाखो रुपयाचा माल चोरीला गेला फक्त वरील दोन्ही चोरीच्या घटनेची तक्रार त्यावेळी सोनखेड पोलिसांनी घेतली नाही पण आता सर्व चोरी सीसी टी व्ही मध्ये कैद झाली व तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला पण वरील सर्व चोरीच्या घटनेत एकाच पद्धत वाफरण्यात आली हे विशेष चोरीचा तपास करून आरोपीस अटक करण्याचे मोठे आव्हान सोनखेड पोलिसांसमोर आहे.

### रामतीर्थ पोलीस ठाण्यातील तीन पोलीस कर्मचाऱ्यांना पदोन्नती

**नायगाव** -रामतीर्थ पोलीस ठाण्यातील तीन पोलीस कर्मचाऱ्यांस पदोन्नती मिळाली असून श्यामसुंदर भवानगीकर यांना हेड कॉन्स्टेबल ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती मिळाली आहे तर पुंडलिक आलेवाड व प्रशांत केसराळीकर यांना नुकतीच पोलीस नाईक ते हेड कॉन्स्टेबल म्हणून पदोन्नती मिळाली आहे. याबद्दल रामतीर्थ पोलीस ठाण्याचे सपोनि श्रीधर जगताप यांनी या पोलीस कर्मचाऱ्यांच्या खांद्यावर बॅज लावून कौतुक केले. व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# लोहा-कंधार तालुक्यात मुंख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचे सव्वा लाख लाभार्थी

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, दि. १४ सप्टेंबर -**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्ग लोहा तालुक्यात ६० हजार २७० तर कंधार तालुक्यात ५८ हजार ६९२ असे एकूण १ लक्ष १८हजार ९६२ लाभार्थी पात्र ठरले आहेत. या बैठकीत ४४ हजार १६४ पात्र लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली. अशी माहिती मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची माहिती लोहा विधानसभा अध्यक्षा प्राणितातार्ई देवरे चिखलीकर यांनी दिली आहे.



तहसील कार्यालयात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लोहा विधानसभा अध्यक्षा प्रणिताताई देवरे (चिखलीकर )यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी उपविभागीय अधिकारी अरुणा संगेवार, लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर, बीडीओ डी. के. आडेराघो, कंधार नायब तहसीलदार रेखा चामनर, लोहा नायब तहसीलदार अशोक मोकले, माजी नगराध्यक्ष किरण सावकार वट्टमवार, समितीचे सदस्य ऑड. गंगाप्रसाद येन्नावार, ऑड मारुती पांढरे, माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती पवार, संजय गांधी निराधार विभागाच्या प्रमुख श्रीमती वैशाली चाटे यांची बैठकिला उपस्थिती होती.

लोहा तहसिल कार्यालयाच्या बैठकीत २२ हजार ६३७ अर्ज मंजूर झाले तर लोहा तालुक्यात पूर्वी ३५ हजार ६०५ महिला पात्र ठरल्या. आजच्या बैठकीत २४ हजार ६६५ अर्ज मंजूर करण्यात आले. जे अर्ज त्रुटीत आहेत त्या अर्जदारांच्या कागदपत्रांची पूर्तता करून ते पात्र व्हावेत अशा सूचना दिल्या. योजनेला समाजातील तळागाळात पोहोचवण्यात सिंहाचा वाटा उचलणाऱ्या अंगणवाडी सेविकां सुपरवायझर, दोन्ही तहसील कार्यालय कर्मचाऱ्यांच्या सहकार्याबद्दल योजनेच्या अध्यक्षा प्राणिताताई देवरे चिखलीकर यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, तलाठी, ग्रामसेवक व कंधार, लोहा तहसील कार्यालयातील कर्मचारी यांची उपस्थित होती.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात बितनाळ जि. प. शाळा तालुक्यात दुसऱ्यांदा प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, दि. १४ सप्टेंबर -**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक दोन मध्ये ही जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सलग दुसऱ्यांदा उमरी तालुकास्तरावरून प्रथम क्रमांक व जिल्हास्तरीय मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा मूल्यांकनासाठी पात्र ठरणारी बितनाळ ही शाळा प्रथम ठरली आहे .

बितनाळ जि प के प्रा शाळा ही गतवर्षीय उमरी तालुक्यात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियनात प्रथम क्रमांकाचे मान मिळविले.

दिनांक ४ सप्टेंबर २४ रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा बितनाळ येथे मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक दोन अंतर्गत केंद्रस्तरीय पथक अंतर्गत तपासणी करण्यात आली तपासणी पथककाचे मुख्य एम. सी .पवार , पवळे आर.के. , एन.पी. नागशेट्टी या सरांनी शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता, शाळेतील शैक्षणिक गुणवत्ता, परिसरातील इतर सुविधा याविषयी सखोल माहिती घेऊन गुणदान केले आणि केंद्रामधून प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत तालुकास्तरीय पथक दिनांक १२ सप्टेंबर २०२४ रोजी शाळेला भेट देण्यासाठी आले शाळेतील विविध मुद्द्यानुसार तपासणी करून सर्व रेकॉर्डची पाहणी करण्यात आली यांप्रसंगी उमरी गटशिक्षण अधिकारी नंदकुमार कुलकर्णी तसेच केंद्रप्रमुख शिंदे , पाटील सर, यांनी शाळेतील गुणवत्ता, विद्यार्थी विकास, परिसर विकास, शाळेतील चालू असलेली उपक्रम याविषयी सखोल माहिती घेऊन तालुका स्तरातून जिल्हा परिषदेची प्रथम शाळा गुणांकनाद्वारे ठरवली.मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत जिल्हास्तरीय गुणांकन दिनांक १३सप्टेंबर २०२४ रोजी पडताळणीसाठी पदमवार गटविकास अधिकारी बिलोली, तसेच औंढेकर मॅडम अधिव्याख्याता डायट नांदेड, तसेच दौलताबादी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती देगलूर तसेच लोलमवार केंद्रप्रमुख बिलोली, यांच्या पथकांनी जिल्हास्तरीय तपासणीसाठी शाळेतील विद्यार्थी गुणवत्ता, शैक्षणिक उपक्रम व इतर अनुषंगाने असलेल्या सर्व बाबींची तपासणी करून जिल्हास्तरीय गुणांकन केले. शाळेतील स्काऊट गाईडच्या पथकाने उपस्थित सर्व मान्यवरांना स्काऊट संचलन करून स्वागत केले व स्काऊट गाईड अंतर्गत विविध उपक्रमांचे सादरीकरण करून दाखवले. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अंतर्गत गुणवत्ता, शैक्षणिक रेकॉर्ड, शालेय परिसर, शाळेमध्ये राबवले जाणारे उपक्रम, सर्व पाहून शाळेची व मुख्याध्यापक भगवान संपतवार सर्व शिक्षक स्टॉप स्तुती केली आहे.सर्वात शेवटी गटविकास अधिकारी यांनी शाळेसाठी जिल्हास्तरीय गुणवत्तेमध्ये शाळेचा क्रमांक यावा यासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत मुख्याध्यापक भगवान सपंतवार यांनी मागील दोन वर्षापासून तालुकास्तरीय मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळेमध्ये प्रथम क्रमांक मिळवल्यामुळे मुख्याध्यापकांचा सत्कार करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला आहे . हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक मुख्याध्यापक भगवान संपतवार , वडमिले एल. के , कळसकर के. एन, मोटरवार व्ही. बी, सौ.कल्याणकर एम. बी , सौ. तांबरे आर. जी , घोगरे यु. एस पेंडलवार एस. पी , शिवणखेडकर एस. जी ' शेख एम एफ आदीने परिश्रम घेतले आहे.

# बैलगाडी मोर्चात जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी सहभागी व्हावे- माधव देवसरकर

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. १४ सप्टेंबर -**

मागच्या पंधरा दिवसापूर्वी पडलेल्या अति मुसळधार पावसामुळे हदगाव- हिमायतनगर तालुक्यातील शेतकरी बांधवांची हाततोंडाशी आलेला घास हिरवल्यामुळे त्यांचे प्रचंड नुकसान झाले असून आज पर्यंत १५ दिवस उलटले तरीसुद्धा शेतकरी बांधवांना कोणत्याही प्रकारची मदत न करणाऱ्या शासनास व अधिकारी यांना जागे करण्यासाठी येत्या बुधवार रोजी दि.१८ सप्टेंबर २०२४ रोजी बैलगाडी मोर्चाच्या आयोजन करण्यात आले असून या मोर्चा दोन्ही तालुक्यातील शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान स्वराज्य पक्षाचे राज्य उपाध्यक्ष माधवराव पाटील देवसरकर यांनी त्यांच्या संपर्क कार्यालयात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत आपले मत व्यक्त केले. यावेळेस तिरूपती पाटील भानगुरे ,बालाजी कराळे, सदा पुयड, देवा इंगळे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

हदगाव - हिमायतनगर या दोन्ही तालुक्यात अतिवृष्टी झाल्याची नोंद सुद्धा झाली असून शासन हे फक्त वेळ काढू धरण अवलंबित आहे. तालुक्यातील ज्या नदीकाठाच्या शेतकरी बांधवांच्या जमिनी आहेत त्या पुरामुळे अक्षरशः खरडून गेलेले आहेत त्यांना विशेष बाब म्हणून निदान दोन-तीन वर्ष तरी अनुदान रुपी काही मदत मिळावे तसेच ज्यांचे अतिवृष्टीमुळे पिके वाया गेली आहेत त्यांना शासनाने तात्काळ सरसकट मदत द्यावी यासह अनेक मागण्यांची निवेदन आम्हास या बैलगाडी मोर्च्याच्या रुपाने शासनास द्यायचे आहेत. जर या मोर्चाची दखल शासनाने न घेतल्यास या पुढच्या आंदोलन स्वराज पक्षामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयावर सुद्धा मोर्चा काढू असा गर्भित इशारा माधवराव पाटील देवसरकर यांनी यावेळेस दिला.

# तूकाराम शेळके यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, दि. १४ सप्टेंबर -**


कूंभारगाव ता.बिलोली येथील रहिवाशी कूंभारगावचे माजी सरपंच तूकाराम रामजी शेळके(७५)यांचे दि.१३सप्टेंबर २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांचा स्वभाव मनमिळाऊ होता. सामाजिक, धार्मिक कार्यात त्यांचा नेहमी सहभाग असायचा, त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, नातू, नातवंडे असा परिवार आहे. सहशिक्षक सोपान शेळके यांचे ते वडील होत. शनिवारी दूपारी कूंभारगाव येथे त्यांच्या पार्थीवावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरीक गावकरी मंडळीसह कै.लक्ष्मणराव पा. हस्सेकर संस्थेचे सचिव अशोक पाटील येंडाळकर, मू.अ.ए.जे.कदम तसेच सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



# महामार्गावरील धनेगावच्या समस्या साठी भेटलो; भाजपात जाण्यासाठी नाही - मनोहर पाटील शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. १४ सप्टेंबर -**

माजी जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील शिंदे धनेगावकर यांनी आपल्या गावच्या महामार्गावरील येणाऱ्या समस्याचे निवेदन घेऊन भाजपाचे राष्ट्रीय महामार्गमंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली असता, काही माध्यमातून उलट सुलट चर्चेला उदान आले होते. तेव्हा पत्रकार परिषद घेऊन मनोहर पाटील शिंदे यांनी आपण गावच्या समस्या सोडवण्यासाठी निवेदन देण्यास गेलो होतो; भाजपात जाण्यासाठी नाही असा खुलासा १३ सप्टेंबर रोजी आ. मोहनराव हंबर्डे यांच्या संपर्क कार्यालयात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिला



नांदेड शहरालगत असलेल्या धनेगाव ते लातूर फाटा येथील ३६१ राष्ट्रीय महामार्गावरील धनेगाव येथील उडानपूल किंवा बोगदा असा रस्ता करून देण्याच्या मागणीचे निवेदन भाजपाचे राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना दिनांक ११ सप्टेंबर रोजी नागपूर येथे त्यांचे निवासस्थानी देण्यात आले होते. सदरील निवेदन देतानाचा नितीन गडकरी यांच्यासोबतचा फोटो व्हायरल झाल्याने काही माध्यमाने काँग्रेसचे मनोहर पाटील पुन्हा भाजपात जाणार का ? असा प्रश्न निर्माण करण्यात आला होता. तेव्हा माजी जि प सदस्य मनोहर पाटील शिंदे यांनी दिनांक १३ सप्टेंबर रोजी आ. मोहनराव हंबर्डे यांच्या संपर्क कार्यालय येथे पत्रकार परिषदे घेऊन आपण भाजपात जाणार नसल्याचे सांगून मी माझ्या गावच्या राष्ट्रीय हामार्गावरील समस्या सोडवून घेण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यास गेलो होतो, यावेळी नांदेड दक्षिणचे आमदार मोहनराव हंबर्डे, माजी जी प सदस्य आनंदराव गुंडले, धनेगावचे सरपंच पिंटू पाटील शिंदे यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली व आमच्या समस्येचे तात्काळ निराकरण करून दिले. सदरील गावचा प्रवास महामार्गाच्या पलीकडे असून गाव अलीकडेच्या बाजूस आहे त्यामुळे गावातील दैनंदिनी शेतीची कामे, गुरेढोरे इत्यादींना महामार्ग क्रमण करताना दुर्घटना होण्याची दाट शक्यता असल्याने गावाची ही सर्वात मोठी अडचण होती. आणि ती राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याशिवाय सुटणारी नसल्याने या समस्यांचे निवेदन घेऊन नितीन गडकरी यांना दिले तेव्हा सदरील निवेदना तील समस्या व गावकऱ्यांचा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यात आला अशी माहिती मनोहर पाटील शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी आमदार मोहनराव हंबर्डे यांचे चिरंजीव राहुल हंबर्डे यांची उपस्थिती होती.

# गोदावरी अर्बन 'सहकार भूषण' पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १४ सप्टेंबर -**

गोदावरी अर्बनने महाराष्ट्रासह, आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक व गुजरात या राज्यांमध्ये सहकार रुजविण्यात व वाढविण्यात मोलाचे योगदान दिल्याबद्दल नॅशनल मल्टीस्टेट फेडरेशनच्या वतीने गोदावरी अर्बनला 'सहकार भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार केंद्रीय सहकार सचिव डॉ.आशिष भूतानी, माजी सहकार मंत्री सुभाषबापू देशमुख, सहकार सहनिबंधक संभाजीराव निकम, राज्य फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांच्या हस्ते संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांनी सर्व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पुरस्कार स्वीकारला. यावेळी मल्टिस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे, बुलढाणा अर्बनचे अध्यक्ष राधेश्याम चांडक यांची प्रमुख उपस्थिती होती. या पुरस्कार सोहळ्यात संस्थेचे उप सरव्यवस्थापक रवी इंगळे, मार्केटिंग मॅनेजर महेश केंद्रे, वणी शाखा व्यवस्थापक विजय मोडक व अधिकारी उपस्थित होते. या सोहळ्याचे आयोजन नॅशनल मल्टीस्टेट फेडरेशनच्या वतीने सहकार भवन शिर्डी येथे करण्यात आले होते.



गोदावरी अर्बनने स्पर्धात्मक युगात सकारात्मक बदल करुन स्वतंत्र कार्यशैली निर्माण केली. सहकार क्षेत्रामध्ये काम करतांना कोणतीही स्पर्धा न करता आपल्या प्रगतीचा आलेख उंचावत ठेवण्याचा विक्रम प्रस्थापित केला आहे. संस्थेने कायमच ग्राहकाला केंद्रबिंदू मानून विविध योजना राबवल्या आहेत. त्यांना आर्थिक साक्षर करून त्यांच्यामध्ये आर्थिक शिस्त रुजविण्यात कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान आहे. ग्राहकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने दर्जेदार व सुलभ सेवा देण्यासाठी संस्था अथक कार्य करीत आहे. संस्था आधुनिकतेची कास धरून काम करीत असते. मागील काही वर्षापासून सहकार क्षेत्रात आमुलाग्र बदल होत आहेत. याचा सकारात्मक स्वीकार करून संस्था वेळोवेळी आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करून त्यांना प्रशिक्षित करीत असते.या पुरस्काराबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्राचे संशोधन केंद्राचे अध्यक्ष मा.खा.हेमंत पाटील, अध्यक्ष राजश्री पाटील यांनी व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, समस्त संचालक, ग्राहक व कर्मचारी यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी वर्धा शाखेचे व्यवस्थापक चंद्रशेखर कामडी,मुख्यालय सहाय्यक व्यवस्थापक गजानन सूर्यवंशी,एकनाथ विभूते,मुख्य शाखा सहाय्यक व्यवस्थापक अतिश कोमटवार, हिंगणघाट शाखाधिकारी कुंदन वेले,माहूर शाखाधिकारी गोपाल खोडके,अर्धापूर शाखाधिकारी सोमेश संगेवार,कुरुंदा विस्तारित शाखा गोपीराज दळवे,सिडको शाखाधिकारी गजानन पाटील,अकोला शाखाधिकारी निखिल जुराफे आदी उपस्थित होते.